# योहानकृत सुवार्ता

1 1 प्रारंभी वचन होते आणि वचन परमेश्वराबरोबर होते, व वचन परमेश्वर
होते; 2 हेच वचन प्रारंभी परमेश्वराबरोबर होते. 3 त्याच्याद्वारे सर्वकाही
उत्पन्न झाले. जे काही उत्पन्न झाले त्यापैकी एकही वस्तु त्याच्यावाचून उत्पन्न
झालेली नाही. 4 वचनात जीवन होते, आणि ते जीवन मनुष्यांचा प्रकाश होते.
5 प्रकाश अंधारात चमकतो आणि अंधाराने त्याला ग्रहण केले नाही. 6 एक
मनुष्य परमेश्वरापासून येऊन उपस्थित झाला, ज्याचे नांव योहान होते. 7 तो
ज्योतिची (प्रकाश) साक्ष देण्यासाठी आला, म्हणजे यासाठी की, त्याच्याद्वारे
सर्वांनी विश्वास ठेवावा. 8 तो स्वतः प्रकाश नव्हता परंतु 'त्या' प्रकाशाची साक्ष
देण्याकरता आला होता. 9 खरा प्रकाश, जो प्रत्येक माणसाला प्रकाशमय करतो,
जगात येणार होता. 10 येशू जगात होते आणि जग त्यांच्याद्वारेच निर्माण
झाले आणि जगाने त्यांना ओळखले नाही. 11 ते आपल्या (त्यांच्या) घरी आले
आणि त्यांच्या प्रियजनांनी त्याचा स्वीकार केला नाही. 12 परंतु जितक्यांनी
त्यांना ग्रहण केले, येशूंनी, त्या सर्वांना परमेश्वराचे संतान होण्याचा अधिकार
दिला, अर्थात त्यांना, जे त्यांच्या नांवावर विश्वास ठेवतात. 13 ते रक्ताने नव्हे,
दैहिक इच्छेने नव्हे किंवा मानवी इच्छेने नव्हे पण परमेश्वरापासून उत्पन्न
झाले आहेत. 14 आणि वचन देह धारण करून आणि कृपा व सत्याने परिपूर्ण
होऊन, आमच्यामध्ये येऊन राहिले आणि आम्ही त्याचे असे गौरव पाहिले
जसे बापाच्या एकुलत्या एकाचे गौरव असावे. 15 योहानाने त्यांच्याविषयी
साक्ष दिली आणि मोठयाने असे म्हटले, 'हे तेच आहेत, जे माझ्यानंतर येणार
आहेत, ते माझ्याहून श्रेष्ठ आहेत, कारण ते माझ्यापूर्वी होते. 16 कारण त्यांच्या
परिपूर्णतेमुळे आपण सर्वांनी मिळवले आहे, अर्थात कृपेवर (अनुग्रह) कृपा.
17 नियमशास्त्र मोशेद्वारे देण्यात आले, परंतु कृपा व सत्य येशू ख्रिस्तांद्वारे
पोहंचली. 18 परमेश्वराला कोणीही, कधीही पाहिलेले नाहीये, केवळ एकुलत्या
एका पुत्राने, जो परमेश्वराच्या उराशी (पित्याबरोबर) आहे, परमेश्वराला प्रगट
केले. 19 योहानाची साक्ष हीच आहे की, जेव्हा यहूदयांनी, यरूशलेमेतून याजक

व लेव्यांना, असे विचारावयास पाठवले की, तो कोण आहे, [20] तेव्हा त्याने
कबूल केले की, तो ख्रिस्त नाहीये. [21] तेव्हा त्यानी त्याला विचारले, "तर मग
तुम्ही कोण आहात? काय तुम्ही एलीया आहात? त्याने उत्तर दिले, 'नाही' तर
मग तुम्ही एखादा संदेष्टा आहात काय? त्याने उत्तर दिले, 'नाही'. [22] मग त्यानी
त्याला पुन्हा विचारले, "तर मग तुम्ही आहात तरी कोण? जेणेकरून आम्ही,
आम्हाला पाठवणाऱ्यांना उत्तर दयावे; तुम्ही आपल्याविषयी काय म्हणता?"
[23] तो म्हणाला, मी जंगलात, एका ओरडणाऱ्याचा शब्द आहे, 'प्रभूंचा मार्ग
तयार करा;' जसे यशया संदेष्टयाने सांगितले आहे. [24] प्रश्न विचारणारे ते
लोक, परूश्यांद्वारे पाठवण्यात आलेले होते. [25] शेवटी त्या लोकांनी त्याला
विचारले, 'जर तुम्ही ख्रिस्त नाही, एलीया नाही व एखादा संदेष्टा नाही, तर
मग बाप्तिस्मा का करता? [26] योहानाने त्यांना उत्तर दिले, 'मी तर पाण्याने
बाप्तिस्मा करतो परंतु तुमच्यामध्ये एक असा मनुष्य आहे ज्यांना तुम्ही ओळखत
नाही, [27] ज्यांची, सेवा आरंभ होणार आहे; ते माझ्याहून श्रेष्ठ आहेत, त्यांच्या
जोडयांचे बंद सोडावे, अशीही माझी लायकी नाही. [28] या सर्व गोष्टी, यार्देनेच्या
पलीकडे बेथानीत घडल्या, जेथे योहान बाप्तिस्मा करत असे. [29] दुसऱ्या दिवशी
त्याने, येशूंना आपल्याकडे येतांना पाहून म्हटले, 'पाहा, हाच परमेश्वराचा
कोकरा आहे, जगाचे पाप उचलून दूर नेणारा हाच आहे. [30] हे तेच आहेत
ज्यांच्याविषयी मी सांगितले होते की, माझ्यानंतर एक असे पुरूष येतील जे
माझ्यापेक्षाही श्रेष्ठ आहेत, कारण ते माझ्यापूर्वी होते'. [31] मी त्यांना ओळखत
नव्हतो मी, पाण्याने बाप्तिस्मा करत आलो आहे अशासाठी की, ते इस्त्राएलावर
प्रगट व्हावेत. [32] योहानाने ही साक्ष दिली, 'मी आत्मा होल्यासारखा (फाख्ता)
आकाशातून उतरतांना पाहिला होता, आणि तो त्यांच्यावर स्थिर झाला होता.
[33] मी तर त्यांना ओळखत नव्हतो परंतु, ज्याने मला पाण्याचा बाप्तिस्मा
करावयास पाठवले होते, त्यानेच मला असे म्हटले होते की, ज्यांवर तू आत्मा
उतरलेला व स्थिरावलेला पाहशील, तेच पवित्र आत्म्याने बाप्तिस्मा करणारे
आहेत. [34] आणि मी पाहिले व साक्ष दिली आहे की, हाच परमेश्वराचा पुत्र आहे.
[35] दुसऱ्या दिवशी पुन्हा योहान व त्याच्या शिष्यांपैकी दोन जण तेथे उभे होते.
[36] तेव्हा योहानाने येशूंना पाहून म्हटले, "पाहा, हा परमेश्वराचा कोकरा आहे!
[37] त्या दोन्ही शिष्यांनी योहानाचे बोलणे ऐकले व त्यानी येशूंचे अनुकरण केले.

38 येशूंनी त्यांना आपल्या मागोमाग येतांना, पाहून विचारले, 'तुम्ही कोणाच्या
शोधात आहात?' ते येशूंना म्हणाले, 'गुरूजी, आपण कोठे राहता? येशू त्यांना
म्हणाले, 'चला, पाहून घ्या'. 39 तेव्हा त्यानी, त्यांची राहण्याची जागा पाहिली
व त्या दिवशी, ते त्यांच्याबरोबरच राहिले. त्या वेळी संध्याकाळचे सुमारे चार
वाजले होते. 40 योहानाचे बोलणे ऐकून येशूंच्या मागे आलेल्या त्या दोघांपैकी
एक, शिमोन पेत्राचा भाऊ अंद्रिया होता. 41 आधी जाऊन त्याने आपल्या
सख्ख्या भावाची भेट घेतली व त्याला म्हटले, 'आम्हाला ख्रिस्त अर्थात मशीहा
सापडले आहेत. 42 तो त्याला येशूंकडे घेऊन आला. येशूंनी त्याला पाहून म्हटले,
'तू तर योहानाचा मुलगा शिमोन आहेस, यापुढे, आता तुला केफा अर्थात
पेत्र म्हणतील'. 43 दुसऱ्या दिवशी येशूंना गालीलास जाण्याची इच्छा झाली.
फिलिप्पाला भेटून, ते त्याला म्हणाले, 'माझ्या मागे ये'. 44 फिलिप्प हा, अंद्रिया
व पेत्राचे नगर बेथसैदा येथील निवासी होता. 45 फिलिप्प नथनेलाला भेटला
आणि म्हणाला, 'ज्यांचे वर्णन मोशेने नियमशास्त्रात व संदेष्टयांच्या पुस्तकात
केले आहे, ते आम्हाला सापडले आहेत; ते योसेफाचे पुत्र येशू नासरेथकर आहेत'.
46 नथनेल त्याला म्हणाला, 'कोणतीही एखादी चांगली वस्तु, नासरेथातून निघू
शकते काय?' फिलिप्पाने त्याला उत्तर दिले, 'चल, आणि पाहून घे'. 47 येशूंनी
नथनेलाला आपल्याकडे येतांना पाहून त्याविषयी म्हटले, 'पाहा, हा खरोखर
इस्त्राएली आहे, याच्यात कपट नाहीये.' 48 नथनेल, येशूंना म्हणाला, 'आपण
मला कोठून ओळखता?' येशू त्याला म्हणाले, 'फिलिप्पाने तुला बोलावण्यापूर्वी
जेव्हा तू अंजिराच्या झाडाखाली होतास तेव्हा मी तुला पाहिले होते.'
49 नथनेलाने येशूंना उत्तर दिले, 'अहो गुरूजी, आपण परमेश्वराचे पुत्र आहात,
आपण इस्त्राएलाचे महाराजे आहात'. 50 येशू त्याला म्हणाले, 'मी जे तुला म्हटले
की, मी तुला अंजिराच्या झाडाखाली पाहिले, त्यामुळे तू विश्वास करतोस
काय? तू यापेक्षा मोठमोठी कृत्यें पाहशील.' 51 येशू असे देखील म्हणाले,
'मी तुम्हाला सत्य-सत्य सांगतो की, तुम्ही स्वर्ग उघडलेला व परमेश्वराचे
परमेश्वरदूत उतरतांना-चढतांना आणि मनुष्याच्या पुत्रावर उतरतांना पाहाल'.

# 2

1 मग तिसऱ्या दिवशी गालीलातील काना नांवाच्या गावी, कोणाचे
तरी लग्न होते व येशूंची आई देखील तेथेच होती. 2 येशू आणि त्यांच्या

शिष्यांनाही लग्नाचे निमंत्रण देण्यात आले होते. 3 जेव्हा द्राक्षारस संपला तेव्हा,
येशूंची आई येशूंना म्हणाली, 'त्यांच्याकडे द्राक्षारस नाहीये; 4 तेव्हा येशू तिला
म्हणाले, 'हे बाई, मला तुझ्याशी काय घेणे-देणे बरे? आता माझा समय आलेला
नाहीये'. 5 येशूंची आई सेवकांना म्हणाली, 'जे काही तो तुम्हाला सांगेल,
तेच करा'. 6 यहूदयांच्या शुद्धीकरणाच्या रीतीनुसार, तेथे दगडाचे सहा माठ
(मडकी) ठेवलेले होते, ज्यात दोन-दोन, तीन-तीन, मण पाणी मावत असे. 7 येशू
त्यांना म्हणाले, 'माठांत पाणी भरा', म्हणून त्यानी माठ काठोकाठ भरले. 8 मग
येशू त्यांना म्हणाले, 'आता, काढून ते मेजवानी-प्रमुखाकडे घेऊन जा'. 9 ते घेऊन
गेले. ज्याक्षणी भोजन प्रमुखाने ते पाणी चाखले, जो आता द्राक्षारस झालेला
होता व त्याला ठाऊक नव्हते की, तो कोठून आला आहे (पण ज्या सेवकांनी
पाणी काढले होते त्यांना ठाऊक होते) त्याक्षणी त्याने वराला बोलावून म्हटले,
10 'प्रत्येक मनुष्य आधी उत्तम द्राक्षारस वाढतो, मग लोक पिऊन तृप्त झाल्यावर,
तो हलका (दुय्यम प्रतीचा) द्राक्षारस देतो, पण तू उत्तम द्राक्षारस आतापर्यंतही
राखून ठेवलेला आहेस.' 11 येशूंनी गालीलाच्या काना गावी तुझे प्रथम चिन्ह
दाखवून तुझे गौरव प्रगट केले, व त्यांच्या शिष्यांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला.
12 त्यानंतर त्यांची आई व त्याचे भाऊ आणि त्याचे शिष्य कफर्णहूमास गेले
आणि तेथे काही दिवस राहिले. 13 यहूदी लोकांचा वल्हांडण-सण जवळ होता
आणि येशू यरूशलेमास गेले. 14 तेव्हा त्यानी मंदिरात, बैल, मेंढरें व कबुतरें
विकणारे व सराफ बसलेले पाहिले, 15 आणि दोराचा चाबुक तयार करून,
त्यानी सर्व मेंढरे-गुरे, मंदिरातून बाहेर काढली. त्यानी सराफांचे पैसे विखरून
टाकले व त्याचे मेज पालथे केले. 16 येशू, कबुतरे विकणाऱ्यांना म्हणाले, 'ही
येथून घेऊन जा, माझ्या पित्याचे भवन व्यापाराचे घर करू नका. 17 तेव्हा,
त्यांच्या शिष्यांना आठवले की लिहिले आहे की, 'आपल्या घराचा उत्साह मला
खाऊन टाकील'. 18 यावर यहूदी त्यांना म्हणाले, "असे करून, आपण आम्हाला
कोणते चिन्ह दाखवत आहात?' 19 येशू उत्तरले, 'हे मंदिर, मोडून टाका आणि
मी तीन दिवसात, ते उभे करीन.' 20 यहूदी म्हणाले, 'हे मंदिर बांधण्यासाठी
शेचाळीस वर्षे लागली, आपण ते फक्त तीन दिवसात उभे कराल काय?'
21 परंतु येशू, आपल्या देहरूपी मंदिराविषयी बोलले होते. 22 म्हणून जेव्हा,
येशू मेलेल्यांतून जिवंत उठले तेव्हा त्यांच्या शिष्यांना आठवण झाली की, येशू

असे बोलले होते; व त्यानी पवित्र वचन आणि त्या शब्दांवर विश्वास ठेवला जे
येशू बोलले होते. [23] ज्यासमयी यरूशलेमेत वल्हांडण सणाकरता ते तेथे होते,
त्यासमयी त्यानी दाखवलेली चिन्हे पाहून, अनेकांनी त्यांच्या नांवावर विश्वास
ठेवला. [24] पण येशूंनी मात्र त्यांच्यावर भरंवसा ठेवला नाही, कारण ते सर्वांना
ओळखत होते. [25] व त्यांना मनुष्याविषयी कोणीही साक्ष देण्याची आवश्यकता
नव्हती कारण त्यांना स्वतःला ठाऊक होते की, मनुष्याच्या अंतःकरणात काय
आहे.

3 [1] परूश्यांपैकी निकदेम नांवाचा एक मनुष्य होता. तो यहूदी, लोकांचा
धार्मिक पुढारी होता. [2] रात्रीच्या समयी तो, येशूंकडे येऊन म्हणाला,
'आम्हाला ठाऊक आहे की, आपण परमेश्वरापासून गुरू म्हणून आला आहात,
कारण परमेश्वर बरोबर नसतील तर, जी चिन्हे आपण दाखवता ती, कोणीही
दाखवू शकत नाही." [3] येशूंनी त्याला उत्तर दिले, 'मी तुला सत्य-सत्य सांगतो
की, जर कोणत्याही मनुष्याचा नवीन रीतीने जन्म होत नाही तर, तो
परमेश्वराचे राज्य पाहू शकत नाही.' [4] निकदेमाने येशूंना विचारले, 'मनुष्य
म्हातारा झाल्यावर, पुन्हा कसा जन्म घेऊ शकेल? तो आपल्या आईच्या गर्भात,
दुसऱ्यांदा जाऊन जन्म घेऊ शकतो काय?' [5] येशूंनी त्याला उत्तर दिले, 'मी
तुला सत्य सत्य सांगतो की, जोवर कोणताही मनुष्य पाणी व आत्म्यापासून
जन्म घेत नाही तोवर तो, परमेश्वराच्या राज्यात दाखल (प्रवेश) होऊ शकत
नाही. [6] कारण जे देहापासून जन्मले आहे ते देह आहे आणि जे आत्म्यापासून
जन्मले ते आत्मा आहे. [7] मी तुम्हाला म्हटले की, तुम्हाला नवीन पद्धतीने जन्म
घेणे आवश्यक आहे याविषयी आश्चर्य करू नका. [8] वारा पाहिजे तिकडे वाहतो
आणि तुम्ही त्याचा आवाज ऐकता पण, तुम्हाला ठाऊक नसते की, तो कोठून
येतो आणि कोठे जातो; जो कोणी आत्म्याने जन्मला आहे तो असाच आहे.
[9] निकदेमाने त्यांना उत्तर दिले, 'या गोष्टी कशा होऊ शकतात?' [10] हे ऐकून येशू
त्याला म्हणाले, 'तुम्ही यहूदी लोकांचे, गुरू आहात तरी सुद्धा, या गोष्टी समजत
नाही काय?' [11] मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, आम्ही ज्याविषयी जाणतो
तेच सांगतो, जे आम्ही पाहिले आहे त्याचीच आम्ही साक्ष देतो आणि तुम्ही
आमची साक्ष स्वीकारत नाही. [12] जेव्हा मी तुम्हाला पृथ्वीच्या गोष्टी सांगतो

आहे तेव्हा तुम्ही भरंवसा करत नाही, जर मी तुम्हाला, स्वर्गातील गोष्टी
सांगितल्या तर मग कसा विश्वास ठेवाल? 13 इतर कोणीही स्वर्गापर्यंत चढला
नाही, केवळ तोच जो स्वर्गातून उतरला अर्थात मनुष्याचा पुत्र जो स्वर्गात
आहे. 14 ज्याप्रकारे मोशेने जंगलात सर्प उंच केला, त्याचप्रकारे मनुष्याच्या
पुत्राचेही उंच चढवले जाणे, आवश्यक आहे; 15 याकरता की, जो कोणी विश्वास
ठेवतो, त्याला त्यांच्याठायी अनंत जीवन मिळावे. 16 कारण परमेश्वराने
जगावर, असे प्रेम केले की, त्याने आपला एकुलता पुत्र दिला यासाठी की, जो
कोणी त्यांच्यावर विश्वास करील त्याचा नाश होऊ नये पण, त्याला अनंत
जीवन मिळावे. 17 परमेश्वराने आपला पुत्र याकरता जगात पाठवला नाही
की, जगावर दंडाची आज्ञा दिली जावी पण याकरता की, जगाने त्यांच्याद्वारे
उद्धार प्राप्त करावा. 18 जो त्यांच्यावर विश्वास ठेवतो, त्याच्यावर दंडाची आज्ञा
होत नाही परंतु जो त्यांच्यावर विश्वास ठेवत नाही, तो दोषी ठरवला गेला
आहे; यासाठीच की त्याने परमेश्वराच्या एकुलत्या पुत्राच्या नांवावर विश्वास
ठेवला नाही. 19 दंडाज्ञा याच कारणास्तव आहे की, प्रकाश जगात आला आणि
मनुष्यांनी अंधाराला प्रकाशापेक्षा प्रिय जाणले; कारण त्यांची कृत्ये दुष्टाईची
होती. 20 कारण जो कोणी दुष्ट कार्ये करतो, तो प्रकाशाशी वैर ठेवतो आणि
प्रकाशाजवळ येत नाही, केवळ यासाठीच की, कोणालाही त्याच्या वाईट
कार्यांवर दोष लावता येऊ नये. 21 पण जो कोणी सत्याचे आचरण करतो तो
जणूकाही प्रकाशाकडे (जवळ) येतो की त्याची सत्य-कार्यें प्रगट व्हावीत की,
ती परमेश्वरातर्फे केलेली आहेत. 22 त्यानंतर येशू आणि त्याचे शिष्य यहूदीयात
आले आणि येशू त्याठिकाणी शिष्यांबरोबर राहून बाप्तिस्मा करू लागले.
23 योहान देखील शालिमाजवळ असलेल्या एनोन या स्थानी बाप्तिस्मा करत
असे कारण तेथे भरपूर पाणी होते व तेथे येऊन लोक बाप्तिस्मा घेत असत.
24 त्या समयापर्यंत योहान, तुरूंगात टाकण्यात आला नव्हता. 25 एका यहूदी
मनुष्याबरोबर योहानाच्या, शिष्यांचा, शुद्धीकरणाविषयी वादविवाद झाला.
26 लोकांनी योहानाकडे जाऊन त्याला म्हटले, 'अहो गुरूजी, जे यार्देनेच्या
पलीकडे, आपल्याबरोबर होते आणि ज्यांच्याविषयीची आपण साक्ष दिलेली
आहे, ते देखील बाप्तिस्मा करतात आणि सर्वजण त्यांच्याकडेच जातात.
27 त्यांना उत्तर देत योहान म्हणाला, 'जोवर मनुष्याला स्वर्गातून दिले जात

नाही तोवर, तो काहीही प्राप्त करू शकत नाही. 28 तुम्ही तर स्वतःच माझे
साक्षी आहात की, मी म्हटले की, मी ख्रिस्त-मशीहा नाहीये, परंतु त्यांच्या
आधी 'पाठवलेला असा' आहे. 29 ज्याची 'वधू' आहे, तोच 'वर' आहे; वराचा
मित्र उभा राहून वराचे ऐकतो आणि वराच्या शब्दांमुळे अत्याधिक आनंदी
होतो. आता माझा हा आनंद पूर्ण झालेला आहे. 30 हे अतिशय आवश्यक आहे
की त्यांची वृद्धी व्हावी आणि मी कमी व्हावे. 31 जो वरून येतो तो सर्वोत्तम
आहे, जो पृथ्वीपासून आहे तो पृथ्वीचा आहे, तो पृथ्वीविषयीच बोलतो; जो
स्वर्गातून येतो, तो सर्वांच्या वर आहे. 32 जे काही त्यानी अर्थात येशूंनी पाहिले
आणि ऐकले, त्याविषयीचीच साक्ष ते देतात आणि त्यांची साक्ष कोणीच
मान्य (स्वीकार) करत नाही. 33 ज्याने त्यांची साक्ष स्वीकारली आहे, त्याने
या गोष्टीवर शिक्का मारला आहे की, परमेश्वर सत्य आहे. 34 कारण ज्याला
परमेश्वराने पाठवले आहे, तो परमेश्वराची वचने बोलतो कारण, तो आत्मा
मोजून-मापून देत नाही. 35 पिता पुत्रावर प्रेम करतो व त्याने सर्वकाही त्याच्या
हाती दिलेले आहे. 36 जो पुत्रावर विश्वास करतो, अनंत जीवन त्याचेच आहे,
परंतु जो पुत्राचे मान्य करत नाही, तो जीवन पाहणार नाही, पण परमेश्वराचा
क्रोध त्याच्यावर राहतो.

4 1 मग जेव्हा प्रभूंना कळले की, परूश्यांनी असे ऐकले आहे की, येशू
योहानापेक्षा अधिक शिष्य करतात आणि त्याचा बाप्तिस्मा करतात;
2 जरी येशू स्वतः नव्हे पण त्याचे शिष्य बाप्तिस्मा करत असत. 3 तेव्हा येशू
यहूदीया सोडून परत गालीलास निघून गेले, 4 व त्यांना शोमरोनातून जाणे
गरजेचे झालेले होते; 5 म्हणून ते शोमरोनाच्या सूखार नांवाच्या नगरापर्यंत
आले; ते त्या जागेजवळ आहे, जे याकोबाने आपला मुलगा योसेफ याला
दिलेले होते. 6 याकोबाची विहीरही तेथेच होती; प्रवास करून थकल्यामुळे
येशू त्या विहीरीवर जाऊन बसले, ही दुपारची वेळ होती. 7 त्याच समयी
एक शोमरोनी स्त्री तेथे पाणी काढावयास आली, येशू तिला म्हणाले, "मला
पिण्याकरता पाणी दे." 8 त्याचे शिष्य त्यावेळी नगरात, भोजन विकत
घेण्यासाठी गेलेले होते. 9 ती शोमरोनी स्त्री येशूंना म्हणाली, "आपण यहूदी
असूनही माझ्यासारख्या शोमरोनी स्त्रीला, प्यावयास पाणी का मागता

आहात?" (कारण यहूदी, शोमरोनी लोकांबरोबर कोणताही संबंध ठेवत नसत).
10 येशू उत्तर देऊन म्हणाले, "जर तू परमेश्वराच्या वरदानाविषयी जाणले
असते आणि तुला हे देखील कळले असते की, तो कोण आहे जो तुला म्हणतो
की, मला प्यावयास पाणी दे तर, तू त्याला मागितले असते आणि त्याने
तुला जीवनाचे पाणी दिले असते." 11 स्त्री त्यांना म्हणाली, "हे प्रभु, पाणी
काढण्यासाठी, आपल्याजवळ काहीही नाहीये आणि विहीरही खोल आहे,
मग ते जीवनाचे पाणी आपल्याजवळ कोठून आले आहे? 12 आपण आमचा
पिता अर्थात याकोबापेक्षा 'मोठे-थोर' आहात काय, ज्याने आम्हाला ही विहीर
दिलेली आहे? 13 ते स्वतः आपल्या मुलांबाळांसह आणि गुरांढोरांसमवेत यातून
प्यायले होते!" येशूंनी तिला उत्तर दिले, 'जो कोणी हे पाणी पिईल तो पुन्हा
तान्हेला होईल, 14 पण जो कोणी, ते पाणी पिईल, जे मी त्याला देईन तो, पुन्हा
अनंतकाळापर्यंत तान्हेला (तहान लागलेला) होणार नाही, पण जे पाणी मी
त्याला देईन, ते त्याच्याठायी एक झरा होईल आणि अनंत जीवनसाठी उसळी
मारत राहील.' 15 ती स्त्री येशूंना म्हणाली, 'हे प्रभु, ते पाणी मला दया जेणेकरून
मला तहान लागू नये आणि पाणी काढण्याकरता येथवर (दूरपर्यंत) यावे लागू
नये. 16 येशू तिला म्हणाले, 'जा, आपल्या पतिस, येथे बोलावून आण.' 17 त्या
स्त्रीने उत्तर दिले, 'मला कोणताही पति नाहीये.' येशू तिला म्हणाले, 'तू अगदी
बरोबर बोलते आहे की, तुला कोणताही पति नाहीये, 18 कारण तुझे पाच पति
झालेले आहेतच व ज्याच्याबरोबर तू आता आहेस, तो सुद्धा तुझा पति नाहीये,
हे तू खरेच बोलली आहेस.' 19 ती त्यांना म्हणाली, 'प्रभु, मला वाटते की, आपण
संदेष्टे आहात; 20 आमच्या पूर्वजांनी याच डोंगरावर आराधना (भजन) केली
आणि आपण म्हणता की, जेथे 'भजन (स्तुति) केले जावे ते स्थळ यरूशलेमेत
आहे.' 21 येशू तिला म्हणाले, 'हे बाई, माझ्या या गोष्टीवर विश्वास धर की,
असा समय येतो आहे, जेव्हा तुम्ही या डोंगरावर किंवा यरूशलेमेतही पित्याचे
भजन (आराधना) करणार नाही. 22 ज्याला तुम्ही ओळखत नाही, त्याची
आराधना करता, आणि आम्ही ज्याला ओळखतो, त्याची भक्ति करतो कारण,
मुक्ति यहूदी लोकांतूनच आहे. 23 परंतु असा समय येतो आहे, किंबहुना आताही
आहेच, जेव्हा 'खरे-सात्विक' भक्त, पित्याची आराधना आत्म्याने व खरेपणाने
करतील, कारण पिता आपल्याकरता अशीच आराधना करणारे भक्त शोधत

असतो. 24 परमेश्वर आत्मा आहे, आणि आवश्यक आहे की, त्याची आराधना
करणाऱ्यांनी, आत्म्याने व खरेपणाने, आराधना करावी. 25 स्त्री त्यांना म्हणाली,
'मला ठाऊक आहे की, मशीहा जे ख्रिस्त म्हणवले जातात ते येणार आहेत, जेव्हा
ते येतील, तेव्हा आम्हाला सर्व गोष्टी सांगतील.' 26 येशू तिला म्हणाले, 'मी जो
तुझ्याशी बोलतो आहे, तोच आहे'. 27 इतक्यात त्याचे शिष्य आले आणि आश्चर्य
करू लागले की, येशू एका स्त्रीशी बोलत आहेत; तरीही कोणी असे बोलले
नाही की आपली काय इच्छा आहे? 28 त्यानंतर लगेच तुझे मडके तेथेच सोडून
व नगरात जाऊन ती लोकांना सांगू लागली, 29 'या, एका अशा मनुष्याला
पाहा, ज्याने मी केलेले सर्वकाही मला सांगितले, हेच तर ख्रिस्त नसावेत ना?"
30 मग ते नगरातून निघाले आणि येशूंकडे येऊ लागले. 31 त्याचसमयी, शिष्य,
येशूंना विनंती करून म्हणाले, "गुरूजी आपण काही जेवून घ्यावे." 32 पण येशू
त्यांना म्हणाले, 'माझ्याजवळ खावयाला असे भोजन आहे ज्याविषयी तुम्हाला
माहित नाहीये.' 33 तेव्हा शिष्य आपसांत म्हणू लागले, 'त्यानी खावे म्हणून
कोणी काही आणले आहे काय? 34 येशू त्यांना म्हणाले, "ज्याने मला पाठवलेले
आहे त्याच्या इच्छेप्रमाणे वागणे आणि त्याचे कार्य पूर्णत्वास नेणे हेच माझे
अन्न (भोजन) आहे. 35 तुम्ही असे म्हणता ना, की कापणीचा समय यावयास
अजून चार महिन्यांचा अवकाश आहे? आपली दृष्टि वर करून शेतांवर नजर
टाका, ती कापणीकरता पिकलेली आहेत. 36 कापणारा मजूरी मिळवतो आणि
अनंत जीवनासाठी फळ गोळा करतो यासाठीच की, पेरणारा व कापणारा,
या दोघांनी मिळून आनंद साजरा करावा. 37 येथे ती म्हण योग्यच आहे की,
पेरणारा एक आहे आणि कापणारा कोणी दुसरा. 38 पाहा, ज्यासाठी तुम्ही
मेहनत केलेली नाहीये परंतु दुसऱ्यांनी श्रम केलेले आहेत, ते शेत कापावयास
मी तुम्हाला पाठवले आणि तुम्ही त्यांच्या परिश्रमाच्या फळात भागीदार
झाला आहात." 39 त्या नगरातील पुष्कळ शोमरोनी लोकांनी, त्या स्त्रीच्या
बोलण्यावरून येशूंवर विश्वास केला, तिने अशी साक्ष दिली होती की, जे
तिने केले होते, येशूंनी ते सर्वकाही सांगितले. 40 जेव्हा शोमरोनी येशूंकडे
आले तेव्हा ते त्यांना विनंती करू लागले, 'आमच्या येथे राहावे'; म्हणूनच येशू
तेथे दोन दिवस राहिले. 41 येशूंच्या शिक्षणामुळे, आणखी पुष्कळ लोकांनी
विश्वास ठेवला. 42 ते लोक, त्या शोमरोनी स्त्रीला म्हणाले, 'आता आम्ही तुझ्या

बोलण्यावरून विश्वास करत नाहीये, कारण आम्ही स्वतःच सर्व ऐकलेले आहे,
आणि आम्हाला ठाऊक आहे (कळले) की, खरोखर हेच जगाचे उद्धारकर्ता
आहेत. 43 त्या दोन दिवसांनंतर येशू तेथून निघून गालीलास गेले. 44 येशूंनी
स्वतःच अशी साक्ष दिली होती की, संदेष्टयाला आपल्या देशात सन्मान मिळत
नाही. 45 जेव्हा ते गालीलात आले, तेव्हा गालीलातील लोक त्यांना सहर्ष
भेटले, कारण यरूशलेमेत जितकी कृत्यें त्यानी सणासमयी केलेली होती, ती
सर्व त्यानी पाहिली होती, कारण ते देखील सणास गेले होते. 46 मग ते पुन्हा
गालीलातील काना गावी गेले, जेथे त्यानी पाण्याचा द्राक्षारस केला होता. तेथे
राजाचा एक कर्मचारी होता, व त्याचा मुलगा कफर्णहूमात आजारी होता. 47 हे
ऐकल्यावर की, येशू यहूदीयातून गालीलात आलेले आहेत, तो त्यांच्याजवळ
गेला आणि त्यांना विनंती करू लागला, 'कृपाकरून या, माझ्या मुलाला बरे
करा' तो मुलगा मरणावस्थेत होता. 48 येशू त्याला म्हणाले, 'जोवर तुम्ही चिन्ह
व चमत्कार (अद्‌भुत कृत्यें) पाहणार नाही तोवर कधीही विश्वास करणार नाही'
49 राजाचा कर्मचारी त्यांना म्हणाला, 'अहो प्रभुजी, कृपाकरून माझा मुलगा
मरण्यापूर्वीच यावे". 50 येशू त्याला म्हणाले, "जा, तुझा मुलगा जिवंत आहे".
त्या माणसाने येशूंचे शब्द स्वीकारले, आणि निघून गेला. 51 तो परत जात
असतांना, त्याचे दास त्याला भेटले व म्हणू लागले की, तुमचा मुलगा जिवंत
आहे. 52 त्याने त्यांना विचारले, "कोणत्या समयापासून तो बरा होऊ लागला
होता?" ते त्याला म्हणाले, "काल दुपारी सुमारे एक वाजता त्याचा ताप गेला".
53 तेव्हा बापाच्या लक्षात आले की, हे त्याच विशिष्ट-समयी घडले ज्यासमयी
येशूंनी म्हटले होते की, तुझा मुलगा जिवंत आहे; मग त्याने व त्याच्या सर्व
घराण्याने विश्वास ठेवला. 54 हे दुसरे आश्चर्यकर्म होते जे, येशूंनी यहूदीयातून
गालीलात आल्यावर प्रगट केले.

5 1 या गोष्टी घडल्यानंतर यहूदयांचा एक सण झाला, व त्याकरता येशू
यरूशलेमेस गेले. 2 यरूशलेमेत मेंढरें-फाटकाजवळ एक कुंड (तळे) आहे,
ज्याला इब्री भाषेत बेथेसदा असे म्हणतात त्याचे पाच व्हरांडे (ओसऱ्या) आहेत.
3 त्या ठिकाणीच पुष्कळ रोगी, आंधळे, लंगडे आणि वाळलेले अवयव असलेले
लोक, पाणी हालण्याच्या आशेने पडून राहात असत. 4 कारण नेमलेल्या समयी,

परमेश्वराचा परमेश्वरदूत कुंडात उतरून पाणी हालवत असे. पाणी हालताच
जो कोणी त्या कुंडात प्रथम उतरत असे तो बरा होत असे; मग त्याला कोणताही
आजार असला तरी. [5] तेथे एक मनुष्य होता जो, अडतीस वर्षांपासून आजारी
होता. [6] येशूंनी त्याला तेथे पडलेला पाहिले व तो बरेच दिवसापासून अशाच
अवस्थेत पडून आहे असे कळल्यानंतर, त्यानी त्याला विचारले, "तुला बरे
व्हावयाचे आहे काय?" [7] तो म्हणाला, "अहो प्रभुजी, पाणी हालवले जातांना,
मला तळयात सोडणारा असा कोणीही मदत करणारा माझ्याजवळ नाहीये,
म्हणून मी पोहंचण्याआधीच, कोणीतरी दुसरा पाण्यात उतरतो." [8] येशू त्याला
म्हणाले, "ऊठ, आपली बाज उचल आणि चालू लाग." [9] तो मनुष्य लगेच बरा
झाला व आपली बाज उचलून चालू फिरू लागला. [10] तो नेमका शब्बाथाचा
दिवस होता म्हणून जो मनुष्य बरा झाला होता, त्याला यहूदी म्हणू लागले,
"आज शब्बाथ दिवस आहे, आज तू बाज उचलणे अयोग्य आहे." [11] त्याने त्यांना
उत्तर दिले, "ज्याने मला बरे केले, त्यानेच मला म्हटले की, आपली बाज उचलून
चालू लाग." [12] त्यानी त्याला विचारले, "तो कोण मनुष्य आहे, ज्याने तुला
म्हटले की, बाज उचलून चालू लाग?" [13] जो बरा झाला होता, त्याला ठाऊक
नव्हते की तो कोण आहे, कारण त्याठिकाणी लोकांची प्रचंड गर्दी असल्यामुळे,
येशू तेथून, वेगळीकडे गेलेले होते. [14] या घटनेनंतर तो मनुष्य येशूंना मंदिरात
आढळला तेव्हा येशू त्याला म्हणाले, "पाहा, तू बरा झालेला आहेस, पुन्हा
पाप करू नकोस, नाहीतर यापेक्षा महाभयंकर विपत्ती तुझ्यावर येईल. [15] त्या
माणसाने यहूदी लोकांकडे जाऊन सांगितले की, ज्याने मला बरे केले तो येशू
आहे. [16] या कारणास्तव यहूदी लोक येशूंचा छळ करू लागले, कारण ते, ही
कृत्यें, शब्बाथ दिवशी करत असत. [17] यावर येशू त्यांना म्हणाले, "माझा पिता
आजही काम करतो आहे व मी देखील काम करतो आहे." [18] या कारणामुळे
यहूदी त्यांना जिवे मारण्याचा, आणखी-जास्त प्रयत्न करू लागले कारण येशू
केवळ शब्बाथ-विधीच मोडत नसत पण, परमेश्वराला आपला पिता म्हणून,
स्वतःला परमेश्वरासारखा ठरवत असत. [19] यावर येशू त्यांना म्हणाले, "मी
तुम्हाला सत्य-सत्य सांगतो की, पुत्र स्वतः काहीही करू शकत नाही केवळ तेच,
जे तो पित्याला करतांना पाहतो कारण जी-जी कार्यें पिता करतो ती-ती कार्यें
पुत्रही त्याचप्रकारे (तऱ्हेने) करतो [20] कारण पिता, पुत्रावर प्रेम करतो, आणि

जी जी कार्ये तो स्वतः करतो, ती सर्व पुत्राला दाखवतो; पिता यापेक्षा महान
कृत्यें त्याला दाखवील यासाठी की, तुम्हाला आश्चर्याचा धक्का बसावा. 21 कारण
जसा पिता मेलेल्यांना जिवंत उठवतो व जगवतो, तसाच पुत्रही (इच्छेनुसार)
हवे त्यांना जिवंत करतो. 22 पिता कोणाचा न्याय देखील करत नाही, परंतु सर्व
न्याय-कार्ये, पित्याने पुत्राला सोपवलेली आहेत, 23 जेणेकरून, ज्याप्रकारे सर्व
लोक पित्याचा आदर करतात, तसाच त्यानी पुत्राचा सुद्धा आदर करावा. जो
पुत्राचा आदर करत नाही तो, ज्याने पुत्राला पाठवलेले आहे त्या पित्याचाही
आदर करत नाही. 24 मी तुम्हाला सत्य सांगतो की, जो माझे शिक्षण ऐकून,
मला पाठवणाऱ्या परमेश्वरावर विश्वास करतो, अनंत जीवन त्याचेच आहे;
त्याच्यावर दंडाचा हुकूम होत नाही पण तो तर, मरणातून पार होऊन जीवनात
दाखल झालेलाच आहे. 25 मी तुम्हाला निश्चित सांगतो की, तो समय येतो आहे,
नव्हे आता आहेच, ज्यात मेलेले (प्रेत) परमेश्वराच्या पुत्राचा शब्द ऐकतील
आणि जे ऐकतील ते जिवंत होतील, होय, जगतील. 26 कारण ज्याप्रकारे
पित्याठायी त्याचे स्वतःचे जीवन आहे त्याचप्रकारे त्याने पुत्रालाही असा
अधिकार दिलेला आहे की, त्याने स्वतः ठायी जीवन असू दयावे, 27 इतकेच
केवळ नव्हे तर, त्याला न्याय करण्याचा सुद्धा अधिकार देण्यात आलेला आहे;
कारण हेच की, केवळ तोच (येशू) मनुष्याचा पुत्र आहे. 28 यास्तव, आश्चर्य करू
नका, कारण आता, तो समय येतो आहे की, जितके कबरेंत आहेत, पुत्राचा
शब्द ऐकून जिवंत उठतील. 29 जितक्यांनी चांगुलपणाची (कल्याणाची) कार्ये
केलेली आहेत, ते जीवनाच्या पुनरूत्थानाकरता जिवंत होतील व जितक्यांनी
दुष्टाई केली आहे, ते दंडाच्या पुनरूत्थानासाठी जिवंत होतील. 30 मी स्वतःहून
काहीही करू शकत नाही, जसे मी ऐकतो, तसाच न्याय करतो. माझा न्याय
खरा आहे कारण मला आपली इच्छा नव्हे तर, मला पाठवणाऱ्याची इच्छा पूर्ण
व्हावयास हवी आहे. 31 जर मी आपलीच (स्वतःची) साक्ष दिली तर, माझी
साक्ष खरी नाही. 32 परमेश्वर आहे, जो माझी साक्ष देतो आणि मला ठाऊक
आहे की, त्याची प्रत्येक साक्ष खरी आहे. 33 तुम्ही योहानाला विचारले आणि
त्याने सत्याची साक्ष दिलेली आहे. 34 परंतु मी, माझ्या स्वतःविषयी माणसाची
साक्ष इच्छीत नाही तरीही या गोष्टी मी यासाठी म्हणतो आहे की, तुमचा
उद्धार व्हावा. 35 योहान एक जळता व चमकणारा दिवा होता आणि त्याच्या

प्रकाशात काही समयापर्यंत मग्न होणे तुम्हाला आवडले. 36 परंतु माझ्याजवळ
जी साक्ष आहे ती योहानाच्या साक्षीपेक्षा मोठी आहे. कारण, पित्याने, पूर्ण
करावयास जे कार्य मला सोपवले आहे अर्थात हीच कार्यें जी मी करतो, तीच
कार्यें, या गोष्टीविषयी साक्ष आहेत की, पित्याने मला पाठवलेले आहे. 37 पिता
ज्याने मला पाठवले आहे, त्याने माझी साक्ष दिली आहे; तुम्ही त्याचा शब्द कधी
ऐकलाही नाहीये आणि त्याचे रूपही पाहिलेले नाहीये. 38 तुम्ही पित्याचे वचन
आपल्या अंतःकरणात दृढ असे राखून ठेवत नाही कारण, त्याने ज्याला पाठवले
आहे, त्याच्यावर तुम्ही विश्वास ठेवत नाही. 39 तुम्ही बायबलमध्ये शोधता
कारण, तुम्ही समजता की, त्यात तुम्हाला अनंत जीवन मिळते; या त्याच गोष्टी
आहेत ज्या माझी साक्ष देतात. 40 तरीपण जीवन प्राप्त करण्यासाठी, तुम्ही
माझ्याजवळ येऊ इच्छीत नाही. 41 माणसांकडून आदर मिळवून घेण्याची,
माझी इच्छा नाहीये. 42 पण मला ठाऊक आहे की, तुमच्या ठायी परमेश्वराचे
प्रेम नाहीये. 43 मी आपल्या पित्याच्या नांवाने आलो आहे, तरी तुम्ही मला
ग्रहण करत नाही. जर एखादा आपल्या स्वतःच्याच नांवाने आला, तर तुम्ही
त्याला स्वीकाराल. 44 तुम्ही विश्वास कसा ठेवू शकाल? तुम्ही एकमेकांपासून
आदर इच्छीता, परंतु सर्वश्रेष्ठ परमेश्वरातर्फे जो आदर आहे, त्याची तुम्हाला
इच्छा नसतेच मुळी. 45 असे समजू नका की, पित्यासमोर, मी तुमच्यावर दोष
लावीन; तुमच्यावर दोष लावणारा तर तो आहे, अर्थात मोशे ज्यावर तुम्ही
भरंवसा ठेवला होता; 46 कारण जर तुम्ही मोशेवर विश्वास ठेवला असता, तर
माझ्यावरही विश्वास ठेवला असता कारण, त्याने माझ्याविषयी लिहिलेले आहे.
47 पण जर, त्याने लिहिलेल्या गोष्टींवर (वचन) तुम्ही विश्वास ठेवत नाही तर,
माझ्या वचनांवर विश्वास कसा ठेवाल?

# 6

1 यानंतर येशू गालीलाच्या अर्थात तिबिर्याच्या सरोवराकाठी गेले.
2 त्यांच्याबरोबर लोकांची एक मोठी गर्दी चालू लागली कारण, जी
अद्भुतें येशू आजाऱ्यांबाबत प्रगट करत होते, ती ते पाहत असत. 3 मग येशू
डोंगरावर चढून आपल्या शिष्यांबरोबर तेथे बसले. 4 यहूदयांचा वल्हांडण सण
जवळ होता. 5 मग येशूंनी आपली दृष्टि वर करून, एक प्रचंड गर्दी आपल्याजवळ
येतांना पाहिली व फिलिप्पाला म्हटले की, आपण त्यांच्या खाण्यासाठी

भाकरी कोठून विकत आणाव्या? [6] पण त्यानी फिलिप्पाला पारखण्याकरता
ही गोष्ट म्हटली कारण, त्यांना ठाऊक होते की, ते स्वतः काय करणार आहेत.
[7] फिलिप्पाने त्यांना उत्तर दिले, "दोनशे दिनारांची भाकर त्यांच्यासाठी
पुरेशीही होणार नाही की, प्रत्येकाला त्यातून थोडी-थोडी तरी खाता यावी.
[8] त्यांच्या शिष्यांपैकी शिमोन पेत्राचा भाऊ अंद्रिया त्यांना म्हणाला, [9] "येथे
एक मुलगा आहे, ज्याच्याजवळ पाच जवाच्या भाकरी व दोन मासे आहेत,
परंतु इतक्या लोकांसाठी, त्याने काय होईल?" [10] येशू म्हणाले, "लोकांना
बसवा." त्याठिकाणी पुष्कळसे गवत होते. मग ते लोक जे सुमारे पाच हजार
पुरूष होते, खाली बसले. [11] मग येशूंनी भाकरी घेतल्या आणि आभार मानून
बसलेल्यांना त्या वाटून दिल्या, त्याचप्रमाणे मासळयांतून, त्यांना हवे तितके
वाढले. [12] जेव्हा ते खाऊन तृप्त झाले तेव्हा येशू आपल्या शिष्यांना म्हणाले,
त्यातील काही फेकले जाऊ नये म्हणूनच "उरलेले तुकडे गोळा करा". [13] त्यानी
तुकडे गोळा केले आणि जवाच्या पाच भाकरी खाल्ल्यानंतर, उरलेल्यांच्या
बारा टोपल्या भरल्या. [14] मग, जो चमत्कार येशूंनी केला तो पाहून लोक म्हणू
लागले की, जो संदेष्टा जगात येणार होता तो खात्रीने हाच आहे. [15] येशूंनी
ओळखून घेतले की, ते मला राजा करण्यासाठी, येऊन धरण्याच्या बेतात
आहेत, तेव्हा ते एकटेच डोंगरावर निघून गेले. [16] संध्याकाळी त्याचे शिष्य
समुद्राकाठी गेले; [17] नावेत चढून समुद्राच्या पलीकडे कफर्णहूमास जाऊ लागले.
त्यावेळी अंधार झालेला होता, आणि असे झाले की येशू अजूनही त्यांच्याकडे
आलेले नव्हते. [18] जबरदस्त-बेफाम वाऱ्यामुळे लाटा समुद्रात, उंच जाऊ
लागल्या. [19] वल्हवून ते सुमारे तीन-चार मैल पुढे निघून गेले तेव्हा त्यानी,
येशूंना समुद्रावरून चालतांना आणि नावेजवळच येतांना पाहिले आणि ते
भ्याले. [20] परंतु येशू त्यांना म्हणाले, "मी आहे! भिऊ नका." [21] त्यानंतरच ते
येशूंना नावेत घेण्याकरता तयार झाले आणि लगेच, ती नाव त्या जागेवर
पोहंचली, जेथे त्यांना जावयाचे होते. [22] दुसऱ्या दिवशी, लोकसमुदायाने, जो
समुद्रापलीकडे उभा होता पाहिले की, येथे एक नाव सोडून आणखी कोणतीच
छोटी नाव नाहीये. येशू आपल्या शिष्यांसमवेत त्या नावेत नव्हते, पण केवळ
त्याचे शिष्य गेले होते. [23] तरीही काही लहान मचवे (बोटी) तिबिर्याहून त्या
जागी आले जेथे, प्रभूंनी आभार मानल्यानंतर त्यानी भाकरी खाल्ल्या होत्या.

24 म्हणून लोकांनी जेव्हा पाहिले की, येथे येशूही नाही व त्याचे शिष्य देखील
नाहीत, तेव्हा ते सुद्धा लहान-लहान नावेत चढले आणि येशूंना शोधत-शोधत
कफर्णहूमास पोहंचले. 25 समुद्राच्या पलीकडे येशूंना भेटल्यावर ते म्हणाले,
"अहो गुरूजी, आपण येथे केव्हा आलात?" 26 येशूंनी त्यांना उत्तर देऊन म्हटले,
"मी तुम्हाला सत्य-सत्य सांगतो की, तुम्ही मला यासाठी शोधत नाहीये की,
तुम्ही आश्चर्यकर्मे पाहिली पण केवळ यासाठी की, तुम्ही भाकरी खाऊन तृप्त
झाला. 27 नाश होणाऱ्या अन्नासाठी परिश्रम करू नका पण त्या अन्नासाठी,
जे अनंत जीवनापर्यंत टिकणारे आहे; मनुष्याचा पुत्र, ते अन्न तुम्हाला देईल,
त्याच्याकरता श्रम करा, कारण पिता अर्थात परमेश्वराने त्याच्यावर शिक्का
मारलेला आहे." 28 ते येशूंना म्हणाले, "परमेश्वराची कार्ये करण्यासाठी आम्ही
काय करावे?" 29 येशू म्हणाले, "परमेश्वराचे कार्य हेच होय की, ज्याला त्याने
पाठवलेले आहे, त्याच्यावर तुम्ही विश्वास करावा. 30 नंतर ते येशूंना म्हणाले,
"मग आपण कोणते चिन्ह दाखवता की, ते पाहून आम्ही आपल्यावर विश्वास
करावा? आपण कोणते कार्य प्रगट करता? 31 आमच्या पूर्वजांनी जंगलात मान्ना
खाल्ला, जसे लिहिले आहे की, त्याने त्यांना खाण्यासाठी स्वर्गातून भाकर
दिली." 32 येशू त्यांना म्हणाले, "मी तुम्हाला सत्य सांगतोः मोशेने तुम्हाला ती
भाकर स्वर्गातून दिलेली नव्हती, पण माझा पिता तुम्हाला स्वर्गातून खरी
भाकर देतो. 33 कारण परमेश्वराची भाकर तीच आहे, जी स्वर्गातून उतरून
लोकांना जीवन देते." 34 मग ते येशूंना म्हणाले, "प्रभुजी, आम्हाला ही भाकर
सर्वदा देत राहा". 35 येशू त्यांना म्हणाले, "जीवनाची भाकर मी आहे, जो
माझ्याजवळ येईल तो कधी भुकेला राहणार नाही आणि जो माझ्यावर विश्वास
धरील तो कधी तान्हेला होणार नाही, 36 परंतु मी तुम्हाला म्हटले होते की,
तुम्ही मला पाहिलेही आहे, तरीही विश्वास ठेवत नाही. 37 जे काही पिता मला
देतो, ते सर्व माझ्याजवळ येईल आणि जो कोणी माझ्याजवळ येईल, त्याला
मी कधीही घालवून लावणार नाही. 38 कारण, मी आपली इच्छा नव्हे पण,
मला पाठवणाऱ्या परमेश्वराची इच्छा पूर्ण करण्याकरता स्वर्गातून उतरलो
आहे. 39 मला पाठवणाऱ्याची इच्छा ही आहे की, जे काही त्याने मला दिले
आहे, त्यातून मी काहीही हरवू नये, परंतु ते शेवटल्या दिवशी पुन्हा जिवंत
उठवावे. 40 कारण माझ्या पित्याची इच्छा ही आहे की, जो कोणी पुत्राला

पाहील आणि त्याच्यावर विश्वास ठेवील त्याला सार्वकालिक जीवन (अनंत
जीवन) मिळावे, आणि मी त्याला शेवटल्या दिवशी पुन्हा जिवंत उठवीन."
41 मग यहूदी येशूंविषयी कुरकुर करू लागले कारण त्यानी म्हटले होते की,
जी भाकर स्वर्गातून उतरलेली आहे ती मी आहे." 42 ते सर्व म्हणाले, "हा
योसेफाचा पुत्र येशू नाही काय, ज्याच्या आई-बापाला आपण ओळखतो?
मग तो कसे म्हणतो की, मी स्वर्गातून उतरलो आहे?" 43 येशूंनी त्यांना उत्तर
दिले, "आपसात कुरकुर करू नका, 44 कोणीही माझ्याकडे तोवर येऊ शकत
नाही जोवर मला पाठवणारा पिता, त्याला खेचून घेत नाही आणि मी त्याला
शेवटल्या दिवशी जिवंत उठवीन. 45 संदेष्टयांच्या लेखात असे लिहिले आहे
की, ते सर्व परमेश्वरातर्फे शिकवलेले असतील, ज्याने पित्याचे ऐकले आणि जो
शिकला तो माझ्याजवळ येतो. 46 पित्याला कोणी पाहिले आहे असे नाही,
पण जो परमेश्वरापासून आहे, केवळ त्यानेच पित्याला पाहिले आहे. 47 मी
तुम्हाला सत्य सांगतो की, जो कोणी विश्वास ठेवतो, अनंत जीवन त्याचेच आहे.
48 जीवनाची भाकर मी आहे. 49 तुमच्या पूर्वजांनी जंगलात मान्ना खाल्ला
आणि ते मेले; 50 ही ती भाकर आहे, जी स्वर्गातून उतरलेली आहे यासाठी की
मनुष्याने तिच्यातून खावे आणि मरू नये. 51 जीवनाची भाकर जी स्वर्गातून
उतरली आहे ती मी आहे; जर कोणी या भाकरीतून खाईल तर तो सर्वकाळ
जिवंत राहील व जी भाकर मी, जगाच्या जीवनासाठी देणार आहे ती माझा देह
आहे." 52 यावर यहूदी वादविवाद करून आपसांत भांडू लागले की, हा मनुष्य
आम्हाला, आपला देह खावयास कसा देऊ शकतो?" 53 येशू त्यांना म्हणाले,
'मी तुम्हाला सत्य सांगतो की, जोवर तुम्ही मनुष्याच्या पुत्राच्या देहातून खात
नाही आणि त्याचे रक्त पित नाही तोवर, तुमच्या ठायी जीवन नाही. 54 पण जो
माझ्या देहातून खातो आणि माझे रक्त पितो, अनंत जीवन त्याचेच आहे व मी
शेवटल्या दिवशी, त्याला जिवंत उठवीन. 55 कारण माझे मांस वास्तविकरित्या
खाण्याचा पदार्थ आहे आणि माझे रक्त खरेच, पिण्याचे पेय आहे. 56 जो माझ्या
देहातून खातो व माझे रक्त पितो, तो माझ्यामध्ये स्थिर राहातो आणि मी
त्याच्यात. 57 जसे जिवंत पित्याने मला पाठवलेले आहे व मी पित्यामुळे जिवंत
आहे तसेच, तो सुद्धा जो, मला खातो माझ्यामुळे जिवंत राहील. 58 जी भाकर
स्वर्गातून उतरली ती हीच आहे, तुमच्या पूर्वजांसारखे नव्हे की खाल्ले आणि

तरीही मरण पावले; जो कोणी ही भाकर खाईल, तो सर्वदा जिवंत (जगेल)
राहील. 59 या गोष्टी येशूंनी, कफर्णहूमाच्या एका आराधनालयात उपदेश
देतांना सांगितल्या. 60 म्हणून त्यांच्या शिष्यांपैकी अनेकांनी ते ऐकून म्हटले,
"ही गोष्ट कटु-सत्य आहे, तिचा स्वीकार कोण करू शकतो?" 61 येशूंनी आपल्या
मनात ओळखून घेतले की, माझे शिष्य, या विषयावर आपसांत कुरकुर करत
आहेत म्हणून त्यानी त्यांना विचारले, "ही गोष्ट तुम्हाला सहन होत नाही काय?
62 आणि जर, मनुष्याचा पुत्र, जेथे तो पूर्वी होता, तेथे त्याला वर जातांना
पाहाल तर तुमचे काय होईल? 63 आत्मा हा जीवनदायक आहे, देहापासून
काहीही लाभ नाहीये; ज्या गोष्टी (वचनें) मी तुम्हाला सांगितल्या त्या आत्मा
आहेत आणि जीवनही. 64 पण तुमच्यापैकी पुष्कळ असे आहेत, जे विश्वास
करत नाहीत;" कारण येशूंना आधीपासूनच जाणीव होती की, विश्वास न
ठेवणारे कोण आहेत आणि कोण त्यांना धरून देईल. 65 ते पुढे म्हणाले, "म्हणून
मी तुम्हाला सांगितले होते की, जोपर्यंत एखादयाला पित्याकडून हे वरदान
दिले जात नाही तोपर्यंत तो माझ्याजवळ येऊ शकत नाही." 66 यावर त्यांच्या
शिष्यांपैकी अनेक लोक परत गेले आणि त्यानंतर त्यांच्याबरोबर राहिले नाही.
67 तेव्हा येशू त्या बारांना म्हणाले, "काय तुम्हालाही परत जाण्याची इच्छा
आहे?" 68 शिमोन पेत्राने त्यांना उत्तर दिले, "अहो, प्रभुजी, आम्ही कोणाकडे
जावे? अनंत जीवनाच्या गोष्टी केवळ आपल्याचजवळ आहेत; 69 आम्ही विश्वास
ठेवला आणि ओळखून घेतले आहे की, परमेश्वराचे 'पवित्र जण' आपणच
आहात." 70 येशू त्यांना म्हणाले, "मी तुम्हां बारा जणांना निवडून घेतलेले नाही
काय? तरीपण, तुमच्यापैकी एक मनुष्य सैतान आहे." 71 असे विधान येशूंनी
शिमोन इस्कर्योत याचा मुलगा यहूदाविषयी केलेले होते, कारण हाच, तो त्या
बारा जणांपैकी एक होता ज्याने येशूंना धरून देण्याचा पिच्छा पुरवला होता.

7 1 या गोष्टी घडल्यानंतर येशू गालीलात सेवाकार्य करत राहिले कारण
यहूदी त्यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करत होते; म्हणूनच ते यहूदीयात,
लोकांच्या नजरेआड राहू इच्छीत होते. 2 त्या दिवसात यहूदयांचा मंडपाचा
सण जवळ आलेला होता. 3 यास्तव त्याचे भाऊ त्यांना म्हणाले, 'येथून
यहूदीयात निघून जा, जेणेकरून जी कामें आपण करता ती, आपल्या शिष्यांना

सुद्धा पाहता यावी. 4 कारण, ज्याला प्रसिद्ध व्हावयाचे असते आणि तरीही जो
लपून काम करतो, असा कोणीही नसेलच मुळी." 5 कारण येशूंचे भाऊ सुद्धा
त्यांच्यावर विश्वास ठेवत नव्हते. 6 तेव्हा येशू त्यांना म्हणाले, "माझा समय
अजूनही आलेला नाहीये परंतु आता, सर्व समय तुमचाच आहे; 7 जग तुमच्याशी
वैर करू शकत नाही, परंतु ते माझा द्वेष करते, कारण मी त्याविरूद्ध अशी साक्ष
देतो की, त्याची कृत्यें दुष्टाईची आहेत. 8 तुम्ही सणासाठी जा, मी आता येणार
नाही कारण आतापर्यंतही माझा समय पूर्ण झालेला नाहीये." 9 त्यांच्याशी असे
बोलून येशू गालीलातच राहिले, 10 परंतु जेव्हा त्याचे भाऊ सणासाठी निघून
गेले तेव्हा येशू तेथे उघडपणे नव्हे तर इतर लोकांसारखे गेले. 11 त्याठिकाणी
यहूदी येशूंचा शोध करून, असे म्हणू लागले की, तो कोठे आहे? 12 लोकांमध्ये
त्यांच्याविषयी पुष्कळशा गोष्टी बोलल्या जात होत्या; काही म्हणत होते, "तो
चांगला मनुष्य आहे", इतर काही म्हणत होते की, 'नाही, तो लोकांना भ्रमात
पाडतो." 13 तरीही यहूदयांच्या भीतिमुळे कोणताही मनुष्य त्यांच्याविषयी
प्रगट रूपाने बोलत नव्हता. 14 जेव्हा त्यांच्या सणाचे अर्धे दिवस आटोपले
तेव्हा, येशू मंदिरात जाऊन उपदेश करू लागले. 15 यावर, यहूदयांनी आश्चर्य
करून म्हटले, "न शिकूनही येशूला ही विदया कशी आली?" 16 येशूंनी त्यांना
उत्तर दिले, "माझा उपदेश माझा नाहीये पण मला पाठवणाऱ्याचा आहे. 17 जर
एखादा त्याच्या इच्छेप्रमाणे चालण्याची इच्छा बाळगत असेल तर तो, या
उपदेशाविषयी ओळखून घेईल की तो परमेश्वरापासून आहे किंवा माझ्यापासून.
18 जो स्वतःतर्फे काही बोलतो, तो स्वतःचीच प्रशंसा इच्छीतो पण जो त्याच्या,
पाठवणाऱ्याची प्रशंसा इच्छीतो, तोच खरा आहे व त्याच्यामध्ये काहीही खोटे
नाहीये. 19 मोशेने तुम्हाला नियमशास्त्र दिले नव्हते काय? तरीपण तुमच्यापैकी
कोणीही, नियमशास्त्रानुसार आचरण करत नाही. तुम्ही मला का जिवे मारू
पाहता?" 20 लोक म्हणाले "तुझ्याठायी दुष्टात्मा आहे, तुला जिवे मारण्याची
इच्छा कोण करतोय?" 21 येशू उत्तर देऊन म्हणाले, "मी एक कार्य केले आणि
तुम्ही सर्व आश्चर्य करता. 22 याच कारणामुळे मोशेने तुम्हाला सुंतेची आज्ञा
केली आहे (ती मोशेपासून आहे असे नाही तर, ती पूर्वजांपासून चालत आलेली
आहे) तुम्ही शब्बाथ दिवशी मनुष्याची सुंता करता. 23 जेव्हा शब्बाथ दिवशी
मनुष्याची सुंता केवळ यासाठीच केली जाते की, मोशेच्या नियमशास्त्राची

आज्ञा टळू नये, मग तुम्ही माझ्यावर का रागावता की, मी शब्बाथ दिवशी एका
मनुष्याला पूर्णतः बरे केले? 24 तोंड पाहून न्याय करू नका परंतु प्रामाणिकपणे
न्याय करा." 25 तेव्हा कितीतरी यरूशलेमकर म्हणू लागले, 'हा तोच आहे
ना, ज्याला जिवे मारण्याचा प्रयत्न केला जातो आहे? 26 पण आता मात्र तो,
उघडउघड बोलतो आहे आणि त्याला कोणी काही म्हणत नाहीये; हे शक्य आहे
काय की, अधिकाऱ्यांनी सत्य-सत्य जाणून घेतले (ओळखले) आहे की, हाच
ख्रिस्त आहे? 27 त्याला आपण ओळखतो की, तो कोणत्या घराण्याचा आहे, पण
जेव्हा मशीहा येईल तेव्हा कोणालाही कळणार नाही की तो कोठला आहे?"
28 मग येशू मंदिरात उपदेश करून मोठयाने म्हणाले, "तुम्ही मला ओळखता
आणि मी कोठला आहे हे देखील जाणता; मी स्वतःहून आलो नाहीये, पण
मला पाठवणारा पिता खरा आहे, त्याला तुम्ही ओळखत नाही. 29 मी त्याला
ओळखतो, कारण मी त्याच्यापासून आहे आणि त्यानेच मला पाठवले आहे."
30 हे ऐकून त्यानी, येशूंना धरण्याचा प्रयत्न केला तरी, एकानेही त्यांच्यावर
हात टाकला नाही कारण, त्याचा समय तोवर आलेला नव्हताच. 31 लोक
समुदायातून पुष्कळ लोकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला आणि म्हणू लागले
की, जेव्हा मशीहा येतील तेव्हा यांनी प्रगट केलेल्या आश्चर्यकर्मांपेक्षा अधिक
अद्भुतें प्रगट करतील काय? 32 येशूंविषयी लोकांनी गुप्तपणे केलेल्या गोष्टी
परूश्यांनी ऐकल्या व महायाजक आणि परूश्यांनी येशूंना धरण्यासाठी शिपाई
पाठवले; 33 हे पाहून येशू म्हणाले, "मी आणखी थोडा वेळ तुमच्याबरोबर आहे
त्यानंतर मी आपल्या पाठवणाऱ्याकडे निघून जाणार. 34 तुम्ही मला शोधाल
पण मी सापडणार नाही आणि जेथे मी आहे तेथे तुम्ही येऊ शकत नाही."
35 यहूदी आपसात म्हणू लागले, "हे कोठे जाणार आहेत की, आपण त्यांना शोधू
शकणार नाही? जे ग्रीक लोकांमध्ये पांगलेल्या अवस्थेत राहतात, त्यांच्याकडे
ते जातील काय? ग्रीक लोकांनाही ते उपदेश करणार काय? 36 त्यांच्या
म्हणण्याचा अर्थ तरी काय की, तुम्ही मला शोधाल पण मी सापडणार नाही व
जेथे मी आहे तेथे तुम्ही येऊ शकत नाही?" 37 मग सणाच्या शेवटल्या दिवशी,
म्हणजे जो मुख्य दिवस आहे, येशू उभे झाले व त्यानी लोकांना मोठयाने म्हटले,
"जर कोणी तान्हेला आहे तर त्याने माझ्याकडे येऊन प्यावे; 38 बायबलमध्ये
लिहिले आहे त्याप्रमाणे, जो माझ्यावर विश्वास ठेवील, त्याच्या आतून जीवन

जलाच्या नदया वाहतील." 39 येशूंनी हे शब्द त्या आत्म्याविषयी म्हटले,
जो त्यांच्यावर विश्वास करणारे प्राप्त करणार होते, आत्मा तोवर उतरलेला
नव्हता, कारण तोवर येशू आपल्या गौरवमय उंचीवर पोहंचले नव्हते. 40 तेव्हा
गर्दीतून काही लोकांनी या गोष्टी ऐकून म्हटले, "खरोखर हाच तो संदेष्टा आहे",
41 इतर दुसरे म्हणाले, "हा मशीहा आहे, "पण काहीजण म्हणाले, "का? मशीहा
गालीलातून येतील काय? 42 बायबलमध्ये असे लिहिलेले नाहीये काय की,
मशीहा दावीदाच्या वंशातून आणि जेथे दावीद राहात होता, त्या बेथलेहेम
गावातून येतील? 43 म्हणून येशूंमुळे लोकांत फूट पडली. 44 त्यांपैकी अनेक लोक
त्यांना धरू पाहात होते पण कोणीही त्यांच्यावर हात टाकला नाही. 45 मग
शिपाई, मुख्य याजक आणि परूश्यांकडे आले व ते शिपायांना म्हणाले, 'तुम्ही
त्याला का आणले नाही?" 46 शिपाई उत्तर देऊन म्हणाले, 'कोणताही मनुष्य,
कधीही अशा गोष्टी बोललेला नाहीये; 47 परूशी त्यांना म्हणाले, 'तुम्हाला ही
भ्रम झाला आहे काय?' 48 अधिकारी किंवा परूशी यांच्यापैकी कोणीतरी,
त्यांच्यावर विश्वास ठेवलेला आहे काय? 49 परंतु हे लोक जे नियमशास्त्र
जाणत नाहीत ते दंडपात्र आहेत." 50 निकदेम (जो आधी येशूंकडे आला होता
व त्यांच्यापैकी एक होता) त्यांना म्हणाला, 51 "तुझे नियमशास्त्र, एखादया
मनुष्याला, जोवर आधी त्याचे ऐकून, जाणून घेत नाही की, तो काय करतो आहे
तोवर त्याला दोषी ठरवते काय?" 52 त्यानी त्याला उत्तर दिले, 'तुम्ही सुद्धा
गालीलाचे आहा काय? शोधा आणि पाहा की, गालीलातून कोणताही संदेष्टा
प्रगट व्हावयाचा नाही." 53 (त्यानंतर सर्व लोक आपआपल्या घरी निघून गेले).

8 1 परंतु येशू जैतून डोंगरावर गेले. 2 आणि सकाळी पुन्हा मंदिरात आले.
तेव्हा सर्व लोक त्यांच्याजवळ आले व ते बसून त्यांना उपदेश करू लागले.
3 मग असे झाले की, धार्मिक पंडित (शास्त्री) व परूशी एका स्त्रीस घेऊन आले
जी व्यभिचार करतांना धरण्यात आली होती आणि तिला मध्ये उभे करून ते
येशूंना म्हणाले, 4 "गुरूजी ही स्त्री व्यभिचार करतांना पकडली गेली आहे.
5 नियमशास्त्रात मोशेने आम्हाला आज्ञा दिली आहे की अशा स्त्रियांना दगडमार
करण्यात यावा; या स्त्रीविषयी आपण काय म्हणता?" 6 ही गोष्ट त्यानी येशूंना
पारखण्यासाठी म्हटली होती जेणेकरून त्यांच्यावर दोष लावण्याची एखादी

संधी लाभावी. पण येशू ओणवे होऊन जमिनीवर बोटाने लिहू लागले. 7 ते
त्यांना विचारत राहिले असताच येशूंनी सरळ उभे राहून त्यांना म्हटले,
"तुमच्यापैकी जो निरपराध आहे त्यानेच तिला सर्वप्रथम दगडमार करावा".
8 पुन्हा येशू खाली वाकून जमिनीवर बोटाने लिहू लागले. 9 पण हे ऐकताच
मोठयांपासून लहानांपर्यंत एक एक करून निघून गेले व येशू एकटे राहिले; ती
स्त्रीही तेथेच मध्ये उभी होती. 10 येशूंनी सरळ उभे राहून तिला विचारले,
"ते सर्व कोठे गेले? तुझ्यावर कोणीही दंडाज्ञा ठरवली नाही काय?" 11 ती
म्हणाली, "प्रभुजी कोणीही नाही;" येशू तिला म्हणाले, "मी पण तुला दंडाज्ञा
ठरवत नाही, जा आणि पुन्हा पाप करू नको." 12 येशू मंदिरातील लोकांना
पुन्हा एकदा म्हणाले, "जगाचा प्रकाश मी आहे, जो कोणी माझे अनुसरण
करतो तो अंधारात चालणार नाही परंतु तो जीवनाचा प्रकाश मिळवून
घेईल." 13 परूशी त्यांना म्हणाले, "आपली साक्ष आपण स्वतःच देत आहात,
आपली साक्ष खरीखुरी नाहीये." 14 येशूंनी त्यांना उत्तर दिले, "मी आपली
साक्ष स्वतःच देत असलो तरीही माझी साक्ष खरीच आहे, कारण मला ठाऊक
आहे की, मी कोठून आलो आहे व कोठे जाणार आहे, परंतु तुम्हाला ठाऊक
नाहीये की, मी कोठून आलो आहे किंवा कोठे जाईन. 15 तुम्ही तोंड पाहून न्याय
करता, मी कोणाचाही न्याय करत नाही; 16 आणि समजा, मी न्याय केलाच,
तरीही माझा न्याय खरा आहे कारण, मी एकटा नाहीये, पण मी आहे व
पिता आहे, ज्याने मला पाठवले. 17 तुमच्या धार्मिक पुस्तकातही लिहिले आहे
की, दोन लोकांची साक्ष मिळून ती पक्की ठरते. 18 एकीकडे मी स्वतः आपली
साक्ष देतो व दुसरीकडे पिता माझी साक्ष देतो, ज्याने मला पाठवलेले आहे."
19 ते येशूंना म्हणाले, "आपला पिता कोठे आहे?" येशूंनी उत्तर दिले, "तुम्ही
मलाही ओळखत नाही व माझ्या पित्यालाही ओळखत नाही. जर तुम्ही, मला
ओळखले असते तर माझ्या पित्यालाही जाणले असते." 20 या गोष्टी त्यानी
मंदिरात उपदेश करतांना, भंडार घराजवळ म्हटल्या, तरीपण कोणीही त्यांना
धरले नाही कारण त्याचा समय अजूनही आला नव्हता. 21 येशू पुन्हा त्यांना
म्हणाले, "मी जातो आहे, तुम्ही मला शोधाल व आपल्या पापांत मराल; जेथे
मी जातो तेथे तुम्ही येऊ शकत नाही" 22 असे ऐकून यहूदी म्हणाले, "तो
स्वतःला मारून टाकील काय? कारण तो म्हणतो आहे की जेथे मी जातो,

तेथे तुम्ही येऊ शकत नाही?" 23 येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही पृथ्वीवरचे
आहात, मी वरचा आहे; तुम्ही जगाचे आहात, मी जगाचा नाहीये. 24 म्हणून
मी तुम्हाला म्हटले की, तुम्ही आपआपल्या पापांत मराल, कारण जर तुम्ही
विश्वास करणार नाही की, मी तोच आहे तर आपल्या पापांत मराल." 25 ते
येशूंना म्हणाले, "आपण कोण आहात?" येशू त्यांना म्हणाले, "मी तोच आहे जे
मी सुरवातीपासून तुम्हाला सांगत आलो आहे, 26 तुमच्याविषयी मला पुष्कळ
काही बोलावयाचे आणि फैसला घ्यावयाचा आहे, परंतु मला पाठवणारा पिता
खरा आहे व मी त्याच्यापासून, जे काही ऐकले आहे तेच जगातील लोकांना
सांगतो." 27 त्या लोकांना कळलेच नाही की, आमच्याशी येशू, पित्याविषयी
बोलत आहे. 28 तेव्हा येशू म्हणाले, जेव्हा तुम्ही मला उंच जागी वर धराल
तेव्हा तुम्ही जाणून घ्याल की, मीच मनुष्याचा पुत्र आहे; मी स्वतःहून काही
करत नाही पण माझ्या पित्याने जसे शिकवले त्याप्रमाणेच या गोष्टी बोलतो.
29 मला पाठवणारा पिता, माझ्याबरोबर आहे, त्याने मला एकटे राहू दिले
नाहीये, कारण मी नेहमी तेच कार्य करतो ज्याद्वारे तो प्रसन्न होतो; 30 येशू
या गोष्टी बोलत असतांनाच कितीतरी लोकांनी त्यांच्यावर विश्वास ठेवला.
31 तेव्हा, त्यांच्यावर विश्वास ठेवणाऱ्या यहूदयांना येशू म्हणाले, "जर तुम्ही
माझ्या शिक्षणाठायी कायम टिकून राहिला तर, खरोखरीच माझे शिष्य ठराल.
32 तुम्हाला सत्य कळेल व सत्य तुम्हाला स्वतंत्र करील." 33 ते येशूंना म्हणाले,
"आम्ही तर अब्राहामाच्या वंशाचे आहो आणि कधी कोणाचे गुलाम झालो
नाही, मग आपण असे कसे म्हणता आहात की तुम्ही स्वतंत्र व्हाल?" 34 येशूंनी
त्यांना उत्तर दिले, "मी तुम्हाला सत्य-सत्य सांगतो की, जो कोणी पाप करतो
तो पापाचा गुलाम आहे. 35 गुलाम नेहमी घरात राहात नाही पण पुत्र सर्वदा
राहातो. 36 म्हणून जर पुत्र तुम्हाला स्वतंत्र करील तर तुम्ही खरोखर स्वतंत्र
व्हाल. 37 मला ठाऊक आहे की, तुम्ही अब्राहामाच्या वंशाचे आहात तरीही
माझी वचने तुमच्या अंतःकरणात जागा मिळेनाशी होतात म्हणूनच तुम्ही मला
जिवें मारू पाहाता. 38 मी तेच सांगतो जे मी आपल्या पित्याकडे पाहिलेले
आहे आणि तुम्ही तेच करत असता जे तुम्ही तुमच्या पित्यापासून ऐकले आहे."
39 त्यानी येशूंना उत्तर दिले, "आमचा पिता तर अब्राहाम आहे." येशू त्यांना
म्हणाले, "जर तुम्ही अब्राहामाचे संतान असता तर, अब्राहामासारखी कार्ये

केली असती. [40] परंतु तुम्ही मला जिवें मारावयाचे पाहाता, मी तुम्हाला,
परमेश्वरापासून ऐकलेली सत्य वचनें सांगितली; पण असे मात्र अब्राहामाने
केले नव्हते. [41] तुम्ही तुमच्या पित्यासारखी कामें करता. "ते येशूंना म्हणाले,
'आम्ही व्यभिचारापासून जन्मलो नाहीये, आमचा एक पिता आहे, अर्थात
परमेश्वर". [42] येशू त्यांना म्हणाले, "जर परमेश्वर तुमचा पिता असता तर,
तुम्ही माझ्यावर प्रेम केले असते, कारण मी परमेश्वरातून निघून आलो आहे;
मी स्वतःहून आलो नाहीये पण परमेश्वराने मला पाठवलेले आहे. [43] तुम्ही,
माझी वचनें समजण्याचा प्रयत्न का करत नाही? यासाठीच की, माझी वचनें
ऐकू शकत नाही; [44] तुम्ही तुमचा पिता, सैतान यापासून आहा आणि तुमच्या
पित्याची लालसाच पूर्ण करू इच्छीता. तो तर, प्रारंभापासून खूनी आहे, तो
सत्यावर स्थिर राहिला नाही, कारण सत्य त्याच्या ठायी नाहीच मुळी. जेव्हा
तो खोटे बोलतो तेव्हा, आपल्या स्वभावानुसारच बोलतो, कारण तो खोटा
आहे, नव्हे खोटयाचा बापच आहे. [45] पण मी सत्य बोलतो म्हणूनच तुम्ही
माझ्यावर विश्वास ठेवत नाही. [46] तुमच्यातील कोण मला पापी ठरवतो आहे?
जर मी सत्य बोलतो आहे तर, तुम्ही माझ्यावर विश्वास का ठेवत नाही? [47] जो
परमेश्वरापासून असतो तो परमेश्वराची वचनें ऐकतो, पण तुम्ही यासाठी
ऐकत नाही कारण परमेश्वरापासून तुम्ही नाहीच." [48] हे ऐकून यहूदी त्यांना
म्हणाले, "आपण शोमरोनी आहात व आपल्याठायी दुष्टात्मा आहे, हे आम्ही
योग्यच बोलत नाही काय?" [49] येशूंनी उत्तर दिले, "माझ्यात दुष्टात्मा नाहीये,
पण मी आपल्या पित्याचा मान राखतो व तुम्ही माझा अपमान करत आहात.
[50] पण मला आपली प्रतिष्ठा (नांव) नकोय (इच्छा नाही); होय, पण एक आहे
ज्याला ती हवी आहे आणि जो न्याय करतो. [51] मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो
की, जर एखादा मनुष्य, माझे वचन मान्य करील, तर तो अनंत काळापर्यंत
मरण पाहणार नाही." [52] यहूदी त्यांना म्हणाले, "आता आम्ही खरेच जाणून
घेतले आहे की, आपल्यात दुष्टात्मा आहे. अब्राहाम मेला आणि संदेष्टे पण मेले
आणि आपण म्हणता की, जो कोणी माझ्या वचनांचे पालन करील तो अनंत
काळापर्यंत मरणाची चव चाखणार नाही. [53] आमचा पिता अब्राहाम मेला
आणि संदेष्टेही मेले तर मग आपण त्याच्यापेक्षाही श्रेष्ठ आहात काय? आपण
स्वतःला काय ठरवता आहात?" [54] येशूंनी उत्तर दिले, "जर मी माझे गौरव

स्वतःच केले तर, माझे गौरव काहीही नाहीये, ज्याच्याविषयी तुम्ही, तुमचा
पिता असण्याचा दावा करता आहात, तोच माझे गौरव करणारा माझा पिता
आहे. 55 तुम्ही त्याला ओळखत नाही पण मी त्याला जाणतो; जर मी असे
म्हटले की, मी त्याला ओळखत नाही तर, मी देखील तुमच्यासारखा लबाड
ठरेन. परंतु मी त्याला जाणतो व त्याची वचनें मान्य करतो. 56 तुमचा पिता
अब्राहाम, माझा दिवस पाहण्याच्या आशेत प्रचंड मग्न होता, त्याने पाहिले
आणि तो आनंदीत झाला." 57 यहूदी त्यांना म्हणाले, "अदयाप आपण पन्नास
वर्षांचेही झाला नाही तरीही म्हणता की आपण अब्राहामाला पाहिलेले आहे?"
58 येशू त्यांना म्हणाले, "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, अब्राहाम उत्पन्न
होण्यापूर्वीच मी आहे." 59 मग त्यानी येशूंना मारण्यासाठी दगड उचलले परंतु
येशू त्यांच्यामधून निसटले व मंदिराबाहेर निघून गेले.

9 1 एकदा येशूंनी जन्मापासून आंधळा असलेला एक मनुष्य पाहिला.
2 त्याला पाहून, त्यांच्या शिष्यांनी त्यांना विचारले, "गुरूजी हा मनुष्य
आंधळा का जन्मला? त्याच्या किंवा त्याच्या आईबापाच्या पापांमुळे?" 3 येशूंनी
उत्तर दिले, "त्याच्या पापांमुळे किंवा त्याच्या आईबापाच्या पापांमुळे नाही, पण
असे यासाठी झाले की, परमेश्वराची कृत्यें त्याच्याठायी प्रगट व्हावीत. 4 ज्या
परमेश्वराने मला पाठवले आहे त्याची कार्यें दिवसा-ढवळया करणे गरजेचे आहे;
अशी रात्र येणार आहे जिच्यात कोणीही कार्य करू शकत नाही. 5 जोवर मी
जगात आहे तोवर जगाचा प्रकाश आहे." 6 असे बोलून येशू जमिनीवर थुंकले व
थुंकीने माती ओली केली, ती घेऊन त्या आंधळयाच्या डोळयांवर लावली, 7 येशू
त्याला म्हणाले, "जा शिलोहच्या तळयात धुऊन घे," (ज्याचा अर्थ पाठवलेला
असा आहे). तेव्हा त्याने तसेच केले व डोळस होऊन परत आला. 8 तेव्हा शेजारी
व ज्यांनी, आधी त्याला भीक मागतांना पाहिले होते ते, म्हणू लागले, "हा तोच
नाही काय जो बसून भीक मागत असे?" 9 पुष्कळजण म्हणाले, 'हा तोच आहे.'
दुसरे लोक म्हणाले, 'नाही', परंतु हा त्याच्यासारखाच आहे," त्याने म्हटले, "मी
तोच आहे." 10 मग ते त्याला विचारू लागले, 'तुझे डोळे कसे उघडले?' 11 त्याने
उत्तर दिले, 'येशू नांवाच्या एका मनुष्याने माती ओली करून माझ्या डोळयांवर
लावली व मला म्हटले की, शिलोहावर जाऊन धुऊन घे, मी तसेच केले आणि

पाहू लागलो आहे." 12 त्यानी त्याला विचारले, 'तो कोठे आहे?' तो म्हणाला,
'मला ठाऊक नाही.' 13 मग जो पूर्वी आंधळा होता, त्याला त्यानी परूश्यांकडे
आणले. 14 येशूंनी त्याचे डोळे ज्या दिवशी बरे केले होते, तो शब्बाथाचा दिवस
होता. 15 मग परूश्यांनीही त्याला विचारले, "तुझे डोळे कसे उघडले?" तो
त्यांना म्हणाला, 'त्या मनुष्याने माझ्या डोळयांवर ओली माती लावली, मग
मी ती धुतली आणि आता डोळस (दृष्टि आली) झालो आहे." 16 हे ऐकून
पुष्कळ परूशी म्हणाले, "हा मनुष्य परमेश्वरापासून नाहीये, कारण तो शब्बाथ
दिवसाचे पालन करत नाही, इतर दुसरे म्हणाले, 'पापी मनुष्य अशाप्रकारचे
चिन्ह कसे करू (दाखवू) शकतो?' याच कारणास्तव त्यांच्यात फूट पडली.
17 ते लोक त्या मनुष्याला म्हणाले, 'ज्याने तुझे डोळे उघडले त्याच्याविषयी
तू काय म्हणतोस?' तो म्हणाला, 'तो संदेष्टा आहे.' 18 ज्याचे डोळे उघडले
होते त्याचे आईबाप बोलावून यहूदयांनी त्याच्या आंधळेपणाविषयी त्यांना
विचारले, जेव्हा त्यानी सांगितले की तो आंधळाच जन्मला होता, तेव्हा त्यानी
विश्वास केला नाही. 19 त्यानी त्यांना विचारले, "आता तो कसा पाहू लागला
आहे?" 20 ते म्हणाले, 'आम्हांला इतकेच ठाऊक आहे की आमचा मुलगा आंधळा
जन्मला होता. 21 पण आम्हाला हे ठाऊक नाही की तो आता कसे पाहू लागला
आहे व आम्हाला हे सुद्धा माहित नाही की, कोणी त्याचे डोळे उघडले; तो
शहाणा आहे त्यालाच विचारा, तो आपल्याविषयी स्वतःच सांगेल.' 22 त्याच्या
आईबापाने असे स्पष्टीकरण यासाठी दिले, कारण ते यहूदयांना भीत होते.
ते यहूदी आपसांत एकमत झाले होते की, जर एखादयाने म्हटले की, येशू
'मशीहा' आहे तर, तो आराधनांलयातून बाहेर काढला जाईल. 23 म्हणूनच
त्याचे आईबाप म्हणाले की, तो शहाणा आहे, त्यालाच विचारा. 24 मग त्यानी
त्या आंधळयाला दुसऱ्यांदा बोलावले व त्याला म्हटले, 'परमेश्वराची स्तुति कर,
आम्हाला ठाऊक आहे की, तो मनुष्य दुष्ट आहे.' 25 त्याने उत्तर दिले, 'मला
ठाऊक नाही की, तो दुष्ट आहे की नाही, मी केवळ एकच गोष्ट जाणतो की मी
आंधळा होतो आणि आता पाहू लागलो आहे." 26 त्यानी त्याला पुन्हा विचारले,
'त्याने तुला काय केले? आणि तुझे डोळे कसे उघडले?' 27 तो त्यांना म्हणाला,
'मी तुम्हाला सांगितलेलेच आहे आणि तुम्ही ऐकले नाही. मग पुन्हा दुसऱ्यांदा
का ऐकू इच्छीता? तुम्ही देखील त्याचे शिष्य व्हावयाची इच्छा बाळगता काय?

28 तेव्हा ते त्याला बरे वाईट बोलून म्हणाले, 'तूच त्याचा शिष्य हो, आम्ही
मोशेचे शिष्य आहो. 29 आम्हाला ठाऊक आहे की परमेश्वर मोशेशी बोलला पण
या मनुष्याला आम्ही ओळखत नाही की, तो कोठून आला आहे.' 30 तो त्यांना
म्हणाला, 'ही तर आश्चर्याची गोष्ट आहे की, तुम्ही त्याला ओळखत नाही की
तो कोठला आहे, तरी त्याने माझे डोळे उघडले; 31 सर्वांना ठाऊक आहे की,
परमेश्वर पाप्यांचे ऐकत नाही, पण एखादा कोणी जर परमेश्वराचा भक्त आहे
व त्याच्या इच्छेप्रमाणे वागतो तर, तो त्याचे ऐकतो. 32 जगाच्या प्रारंभापासून
असे कधी ऐकलेले नाही की, कोणीही जन्मांधाचे डोळे उघडले असावे. 33 हा
मनुष्य जर, परमेश्वरापासून नसता तर, तो काहीही करू शकला नसता.' 34 ते
त्याला म्हणाले, 'तुझा जन्म पापांत झालेला आहे आणि तू आम्हांला काय
शिकवतोस? व त्यानी त्याला बाहेर हाकलून दिले. 35 येशूंनी ऐकले की, त्यानी
त्याला बाहेर घालवले आहे; जेव्हा त्याच्याशी त्यांची भेट झाली तेव्हा येशू
म्हणाले, "तू परमेश्वराच्या पुत्रावर विश्वास ठेवतो काय?" 36 तो म्हणाला,
'प्रभुजी, तो कोण आहे की, मी त्यावर विश्वास ठेवावा?' 37 येशू त्याला म्हणाले,
"तू त्याला पाहिलेले आहे व जो तुझ्याशी बोलत आहे, तोच आहे." 38 तो
म्हणाला, 'प्रभुजी, मी विश्वास ठेवतो;' व त्याने येशूंना दंडवत घातले.' 39 तेव्हा
येशू त्याला म्हणाले, "मी या जगात न्यायासाठी आलो आहे, यासाठी की, जे
पाहू शकत नाही त्यानी पाहावे व जे पाहू शकतात त्यानी आंधळे व्हावे." 40 जे
परूशी त्यांच्याबरोबर होते, त्यानी या गोष्टी ऐकून येशूंना म्हटले, 'आम्हीही
आंधळे आहोत काय? 41 येशू त्यांना म्हणाले, "तुम्ही आंधळे असता तर पापी
ठरवले गेले नसता, पण तुम्ही म्हणता की आम्हाला दिसते म्हणूनच तुमचे पाप
कायम (जसेच्या तसे) राहाते."

10 1 मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, जो कोणी मेंढवाडयात दाराने
प्रवेश करत नाही पण दुसऱ्या वेगळया मार्गाने प्रवेश करतो, तो
चोर व दरोडेखोर आहे. 2 परंतु जो दारातून आत प्रवेश करतो, तोच मेंढरांचा
मेंढपाळ आहे. 3 त्याच्यासाठी द्वारपाळ दार उघडतो व मेंढरे त्याचा आवाज
ऐकतात. तो आपल्या मेंढरांना त्यांची नांवे घेऊन हाक मारतो व बाहेर घेऊन
जातो. 4 तो आपली सर्व मेंढरे बाहेर काढून, त्यांच्या पुढेपुढे चालतो व मेंढरे

त्याच्या मागे-मागे चालतात कारण, ती त्याचा आवाज ओळखतात. 5 मेंढरे
परक्या माणसाच्या मागे जाणार नाहीत पण त्याच्यापासून दूर पळतील कारण,
ती अनोळख्यांची हाक ओळखत नाही." 6 येशूंनी त्यांना हा दृष्टांत सांगितला
पण ते समजू शकले नाही की, येशू त्यांच्याशी काय बोलू इच्छीत आहे. 7 यास्तव
येशू पुन्हा त्यांना म्हणाले, "मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, मेंढरांचे दार मी
आहे. 8 जितके माझ्या आधी आले, ते सर्व चोर व लुटारू आहेत, पण मेंढरांनी
त्याचे ऐकले नाही. 9 दार मी आहे; जर कोणी माझ्याद्वारे आत प्रवेश करील तर
तो मुक्ति मिळवील आणि आत-बाहेर, ये-जा करील व त्याला चारा मिळेल.
10 चोर इतर कोणत्याही कामासाठी नव्हे परंतु केवळ चोरी करावयास,
घात करावयास आणि नाश करावयास येतो. मी यासाठी आलो की, त्यांना
जीवन प्राप्त व्हावे आणि तेही प्रचंड विपुलपणाचे जीवन मिळावे. 11 उत्तम
मेंढपाळ मी आहे, उत्तम मेंढपाळ, मेंढरांसाठी आपला प्राण देतो. 12 मजूर,
जो मेंढपाळही नाही व मेंढरांचा मालकही नाही, तो लांडगा येतांना पाहून,
मेंढरे सोडून पळून जातो, लांडगा झडप घालून मेंढरे पांगवून टाकतो. 13 मजूर
यासाठी पळून जातो कारण तो केवळ मजूर आहे, त्याला मेंढरांची काळजी
नसतेच मुळी. 14 उत्तम मेंढपाळ मी आहे. ज्याप्रकारे पिता मला ओळखतो
त्याचप्रकारे मी पित्याला ओळखतो; 15 त्याप्रमाणेच मी आपली मेंढरे ओळखतो
व माझी मेंढरे मला ओळखतात. मी मेंढरांसाठी आपला प्राण देतो. 16 माझी
इतर आणखी मेंढरे आहेत, जी या मेंढवाडयातील नाहीत, मी तीही घेऊन
येणे गरजेचे आहे. ती माझा आवाज ऐकतील, मग एकच कळप आणि एकच
मेंढपाळ असेल. 17 पिता माझ्यावर यासाठी प्रेम करतो कारण मी आपला प्राण
देतो, याकरताच की तो पुन्हा परत घ्यावा. 18 कोणी माझा प्राण माझ्यापासून
हिसकून घेत नाही पण मी तो, स्वतःच देतो. मला तो देण्याचाही अधिकार
आहे आणि तो परत घेण्याचाही हक्क आहे; ही आज्ञा मला माझ्या पित्यापासून
मिळालेली आहे. 19 या गोष्टींमुळे, यहूदी लोकांत पुन्हा एकदा फूट पडली.
20 त्यांच्यापैकी बरेच लोक म्हणू लागले की, "येशूंठायी दुष्टात्मा आहे व तो वेडा
आहे त्याचे का ऐकता?" 21 इतर लोक म्हणाले, 'या गोष्टी अशा मनुष्याच्या
नाहीत ज्याच्यामध्ये दुष्टात्मा असतो, दुष्टात्मा आंधळयांचे डोळे उघडू शकतो
काय? 22 यरूशलेमेत समर्पणाचा सण झाला, आणि ऋतू हिवाळयाचा होता.

[23] येशू मंदिरात शलमोनाच्या परमेश्वरडीत फिरत होते. [24] त्यावेळी यहूदयांनी
येऊन व वेढा घालून त्यांना विचारले, 'आपण आम्हाला कोठवर पेचात (शंका)
ठेवणार? जर आपण 'मशीहा' आहात तर आम्हाला स्पष्टपणे तसे सांगा.'
[25] येशूंनी उत्तर दिले, "मी तुम्हाला तसे सांगितलेलेच आहे, पण तुम्ही मान्य
करतच नाही. जी कार्ये मी आपल्या पित्याच्या नांवाने करतो, ती कार्येंच माझी
साक्ष आहेत. [26] तुम्ही याकरता विश्वास ठेवत नाही कारण, तुम्ही माझ्या
मेंढरांपैकी नाहीच मुळी. [27] माझी मेंढरे माझा आवाज ऐकतात व मी त्यांना
ओळखतो; ती माझी आज्ञा (मान्य) पाळतात. [28] मी त्यांना अनंत जीवन देतो
आणि ती, कधीही नाश पावणार नाही; व कोणीही ती, माझ्या हातून हिसकून
घेणार नाही'. [29] माझ्या पित्याने मला 'ती' दिलेली आहेत, तो सर्वांपेक्षा महान
आहे, व कोणी ती, पित्याच्या हातांतून हिसकू शकत नाही. [30] मी व पिता एक
आहो. [31] असे ऐकताच, यहूदयांनी येशूंना दगडमार करण्यासाठी पुन्हा दगड
उचलले. [32] तेव्हा येशू त्यांना म्हणाले, "मी तुम्हाला आपल्या पित्याकडील
बरीच कल्याणकारी कृत्यें दाखवली, त्यांपैकी कोणत्या कृत्यामुळे, तुम्हा मला
दगड मारत आहा?" [33] यहूदी म्हणाले, "भल्या हितकारक कृत्यांमुळे आम्ही
आपल्याला दगडमार करत नाहीये परंतु परमेश्वराची निंदा केल्यामुळे आणि
यासाठी सुद्धा की, आपण मनुष्य असून आपल्या स्वतःला परमेश्वर (तुल्य)
करता आहात." [34] येशू त्यांना म्हणाले, "तुमच्या धार्मिक पुस्तकांत लिहिले
नाहीये काय की, मी म्हटले, तुम्ही परमेश्वर आहात?" [35] परमेश्वराने 'त्या'
सर्वांना परमेश्वर म्हटले, 'ज्या प्रत्येकापर्यंत' परमेश्वराचे वचन पोहंचले (आणि
पवित्र बायबलचे वचन लोप पावू शकत नाही); [36] आणि ज्याला पित्याने पवित्र
ठरवून जगात पाठवलेले आहे, त्याला तुम्ही म्हणता की, तुम्ही निंदा करता
आहात, आणि यावरून काय की, मी म्हणालो, मी परमेश्वराचा पुत्र आहे?"
[37] जर मी, माझ्या पित्याचे कार्य करत नाही तर, माझ्यावर विश्वास ठेवू नका,
[38] पण जर मी, ते करतो तर तुम्ही माझ्यावर विश्वास ठेवला नसला तरी, त्या
कार्यावर विश्वास ठेवा, म्हणजे तुम्हाला जाणीव होईल व समजेल की, पिता
माझ्यामध्ये व मी पित्यामध्ये आहे." [39] मग त्यानी पुन्हा येशूंना पकडण्याचा
प्रयत्न केला परंतु येशू त्यांच्या हाती लागले नाही (निसटले). [40] त्यानंतर ते,
यार्देनेच्या पलीकडे त्याच जागी गेले जेथे योहान आधी बाप्तिस्मा करत असे व

तेथेच राहिले. 41 अनेक लोक त्यांच्याकडे जाऊन म्हणत होते की, योहानाने तर
कोणतेही चिन्ह दाखवले नाही, पण जे काही योहानाने येशूंविषयी सांगितले
होते, ते सर्व खरे होते. 42 आणि तेथे अनेक लोकांनी येशूंवर विश्वास ठेवला.

11 1 मरीया आणि तिची बहीण मार्था यांच्या गावी अर्थात बेथानीत
लाजर नांवाचा एक मनुष्य आजारी होता. 2 ही तीच मरीया होती
जिने प्रभूंवर अत्तर घालून त्याचे पाय, आपल्या केसांनी पुसले होते; लाजर
तिचाच भाऊ होता. 3 म्हणून त्याच्या बहिणींनी, येशूंना संदेश पाठवला की,
"प्रभुजी आपण ज्याला प्रेम करता, तो आजारी आहे." 4 हे ऐकून येशू म्हणाले,
"हा आजार मरणासाठी नव्हे पण परमेश्वराच्या गौरवासाठी आहे, यासाठी की,
त्याद्वारे परमेश्वराच्या पुत्राचे गौरव व्हावे". 5 येशू, मार्था, तिची बहीण मरीया
व लाजरावर प्रेम करत होते. 6 म्हणून जेव्हा येशूंना कळले की तो आजारी
आहे तेव्हा ज्या स्थानी ते होते, तेथे दोन दिवस आणखी थांबले 7 यानंतर येशू
शिष्यांना म्हणाले, "या चला आपण पुन्हा यहूदीयात जाऊ." 8 शिष्य त्यांना
म्हणाले, "गुरूजी आताच यहूदी आपल्याला दगडमार करू पाहात होते. आपण,
पुन्हा तेथेच जाऊ इच्छीता काय?" 9 येशू म्हणाले, "दिवसाचे बारा तास
नसतात काय? जो दिवसा चालतो तो ठेचाळत नाही कारण, तो या जगाचा
प्रकाश पाहातो. 10 पण जर कोणी रात्री चालतो, त्याला ठेच लागते कारण
त्यामध्ये प्रकाश नाही." 11 येशू असे बोलले व त्यानंतर त्यांना म्हणाले, "आपला
मित्र लाजर झोपी गेला आहे परंतु मी त्याला जागे करण्यास जातो आहे." 12 हे
ऐकून शिष्य त्यांना म्हणाले, 'प्रभुजी, जर तो झोपला आहे तर जागा होईल."
13 येशू त्याच्या मरणाविषयी बोलले होते पण त्यांना वाटले की येशू लाजराच्या
झोपेविषयी बोलले आहेत. 14 त्या समयी येशूंनी त्यांना स्पष्टपणे सांगितले,
"लाजर मेला आहे; 15 मी तुमच्यामुळे आनंदी आहे की, मी तेथे नव्हतो जेणेकरून
तुम्ही विश्वास ठेवावा. आता या, आपण त्याच्याकडे जाऊ." 16 तेव्हा थोमा जो
दिदुम म्हणवतो, आपल्याबरोबरच्या शिष्यांना म्हणाला, "चला आपण देखील
त्यांच्याबरोबर मरण्यासाठी जाऊ या." 17 तेथे गेल्यावर येशूंना ही बातमी
कळली की, लाजराला कबरेत ठेवून, चार दिवस झालेले आहेत. 18 बेथानी हे
गाव यरूशलेमेपासून फक्त दोन मैल दूर होते. 19 त्या स्थानी पुष्कळ यहूदी,

मार्था व मरीया यांना, भावाबद्दल सांत्वन (शांति) देण्यासाठी आले होते.
20 येशूंच्या आगमनाची खबरबात ऐकून मार्था येशूंना भेटण्यास गेली परंतु
मरीया घरीच बसून राहिली. 21 मार्था येशूंना म्हणाली, 'प्रभुजी, जर आपण येथे
असता तर माझा भाऊ कधीच मेला नसता आणि आता ही मला ठाऊक आहे की,
जे काही आपण परमेश्वराला मागाल, परमेश्वर आपल्याला देईल. येशू तिला
म्हणाले, "तुझा भाऊ जिवंत होईल." 24 मार्था त्यांना म्हणाली, 'मला ठाऊक
आहे की, शेवटल्या दिवशी पुनरूत्थानाच्या समयी तो जिवंत उठेल.' 25 येशू
तिला म्हणाले, "पुनरूत्थान व जीवन मीच आहे, जो कोणी माझ्यावर विश्वास
ठेवतो, तो जर मेला, तरीही जगेल. 26 जो कोणी जिवंत आहे आणि माझ्यावर
विश्वास ठेवतो तो अनंतकाळापर्यंत मरणार नाही यावर तू विश्वास ठेवते
काय?" 27 मार्था येशूंना म्हणाली, "होय, प्रभुजी, मी विश्वास धरलाच आहे की,
परमेश्वराचा पुत्र मशीहा जो जगात येणार होता तो 'आपणच आहात.' 28 असे
म्हणून ती गेली आणि गुप्तपणे आपली बहीण मरीया हिला बोलावून म्हणाली,
'गुरूजी येथेच आहेत व तुला बोलवत आहेत.' 29 हे ऐकताच मरीया लगेच उठून
येशूंकडे निघाली. 30 (तोवर येशू, गावात पोहंचले नव्हते, पण त्याच स्थानी
होते, जेथे मार्थेने त्यांची भेट घेतली होती). 31 काही यहूदी जे मरीयेबरोबर
तिच्या घरी गेले व तिला दिलासा देत होते, त्या सर्वांनी पाहिले की, मरीया
ताबडतोब उठून बाहेर गेलेली आहे आणि, ती विलाप करावयास कबरेकडे जाते
आहे असे समजून, ते देखील तिच्या मागे जाऊ लागले. 32 ज्यावेळी मरीया,
तेथे येशूंकडे पोहंचली त्यावेळी त्यांना पाहता क्षणीच, त्यांच्या पायांशी पडून
त्यांना म्हणाली, 'प्रभुजी, जर आपण येथे असता तर, माझा भाऊ मेला नसता."
33 जेव्हा येशूंनी तिला व तिच्याबरोबरच्या यहूदी लोकांना रडतांना पाहिले
तेव्हा, आत्म्याठायी ते उदास आणि व्याकुळ होऊन म्हणाले, "तुम्ही त्याला कोठे
ठेवलेले आहे?" 34 ते येशूंना म्हणाले, 'प्रभुजी, चला पाहून घ्या'. 35 येशूंचे अश्रू
वाहू लागले. 36 मग हे पाहून यहूदी, म्हणू लागले, 'पाहा, लाजरावर ते किती
प्रेम करत होते!' 37 परंतु त्यांच्यापैकी कितीतरी लोक म्हणाले, "हे, ज्यांनी
आंधळयाचे डोळे उघडले ते, 'त्याने जगावे यासाठी', असे काहीही करू शकले
नाही काय की, ज्याने तो मेलाच नसता?' 38 येशू मनात खूप दुःखी होऊन
कबरेवर आले. ती एक गुहा होती व एक धोंड तिच्यावर ठेवलेली होती. 39 येशू

म्हणाले, "धोंड बाजूला करा." त्या मृताची बहीण मार्था त्यांना म्हणाली,
'प्रभुजी, आता मात्र त्यातून घाण वास येत असेल, कारण तो मरून चार दिवस
झालेले आहेत. 40 येशू तिला म्हणाले, "मी तुला सांगितले नव्हते काय की,
जर तू विश्वास ठेवशील तर परमेश्वराचे कार्य पाहाशील?" 41 मग त्यानी
धोंड काढली. येशूंनी आपली दृष्टि वर करून म्हटले, "बापा मी तुझे आभार
मानतो की तू माझे ऐकले आहे. 42 मला ठाऊक होते की तू सदैव माझे ऐकतो
पण लोकांची जी गर्दी आजूबाजूला उभी आहे, त्यांच्यासाठी मी असे म्हणतो,
जेणेकरून त्यानी विश्वास धरावा की, तूच मला पाठवलेले आहे." 43 असे म्हणून
येशूंनी मोठया शब्दाने हाक मारून त्याला बोलावले, "लाजरा निघून ये." 44 हे
ऐकून, जो मेला होता, तो हातपाय बांधलेला असा, बाहेर निघून आला, त्याचे
तोंड कापडाने गुंडाळलेले होते. येशू लोकांना म्हणाले, 'त्याची बंधने उघडा व
त्याला जाऊ दया.' 45 त्यावेळी, मरीयेबरोबर जे यहूदी आले होते तसेच ज्यांनी
येशूंचे हे कृत्य पाहिले होते, त्यांपैकी अनेकांनी येशूंवर विश्वास ठेवला. 46 परंतु
त्यांच्यापैकी पुष्कळ लोक परूश्यांकडे गेले व त्यांना येशूंच्या कार्यांची खबर
कळवली. 47 यावर मुख्य याजक व परूश्यांनी मुख्य सभेच्या लोकांना एकत्र
करून म्हटले, 'आपण काय करत आहोत? हा मनुष्य कितीतरी चिन्हें करतो
आहे, 48 जर आपण त्याला असेच सोडून दिले तर मात्र, सर्वजण त्याच्यावर
विश्वास ठेवतील आणि रोमन लोक येऊन आपली पदें (स्थान) हिसकतील
आणि लोकांवर अधिकारही दाखवतील.' 49 मग त्यांच्यापैकी कयफा नांवाचा
एक पुरूष जो त्या वर्षाचा मुख्य याजक होता त्यांना म्हणाला, 'तुम्हाला
काहीच माहित नाहीये, 50 शिवाय तुम्ही असा विचार देखील करत नाहीये
की, आमच्यासाठी हेच हितकारक आहे की, सबंध देश नाश पावण्याऐवजी,
आपल्या लोकांसाठी, एकाच मनुष्याने मरावे.' 51 असे तो स्वतःद्वारे बोलला
नव्हता पण त्या वर्षाचा प्रमुख याजक असण्याच्या नात्याने, त्याने भविष्यवाणी
केली की, येशू त्या राष्ट्रासाठी आपला प्राण देतील; 52 केवळ त्याच राष्ट्रासाठी
नव्हे तर यासाठी सुद्धा की, परमेश्वराचे इकडे तिकडे पांगलेले संतान एकत्र
करावे. 53 त्या दिवसापासूनच ते येशूंना जिवे मारण्याचे षडयंत्र रचू लागले.
54 याच कारणास्तव येशू, त्या समयापासून, यहूदयांमध्ये उघडपणे दिसले
नाही पण ते तेथून, जंगलाजवळच्या देशात, एफ्राईम नांवाच्या नगरास निघून

गेले, व आपल्या शिष्यांबरोबर तेथेच राहू लागले. 55 यहूदी लोकांचा वल्हांडण
सण जवळ होता व बरेच लोक, वल्हांडण सणाआधी, स्वतःला शुद्ध करून
घेण्यासाठी, गावातून यरूशलेमेस गेले. 56 ते लोक येशूंना शोधू लागले आणि
मंदिरात उभे राहून आपसांत म्हणू लागले, 'तुम्हाला काय वाटते? येशू वल्हांडण
सणास येणार नाहीत काय? 57 मुख्य याजक व परूश्यांनी अशी आज्ञा दिलेली
होती की, जर एखादयाला ठाऊक असेल की, येशू कोठे आहेत तर, त्याने खबर
दयावी म्हणजे त्यांना धरून घेता यावे.

12 1 मग येशू वल्हांडणाच्या सहा दिवस अगोदर, जेथे लाजर होता तेथे
अर्थात बेथानीस आले; याच लाजराला, येशूंनी मेलेल्यांतून जिवंत
केले होते. 2 तेथे त्या लोकांनी येशूंसाठी भोजन तयार केले आणि मार्था सेवा
करत होती; जे जेवावयास बसलेले होते, त्यांच्यापैकी लाजरही एक होता.
3 त्यावेळी मरियेने जटामांसीचे, अर्धा लीटर, बहुमूल्य सुगंधी अत्तर आणून
येशूंच्या पायांवर ओतले व आपल्या केसांनी त्याचे पाय पुसले. जटामांसीच्या
सुगंधाने संपूर्ण घर दरवळले (भरून गेले), 4 परंतु त्यांच्या शिष्यांपैकी यहूदा
इस्कर्योत नांवाचा शिष्य जो त्यांना धरून देऊ इच्छीत होता, म्हणू लागला,
5 'हे अत्तर तीनशे चांदीच्या नाण्यांत विकून गरीबांना का देण्यात आले नाही?'
6 असे तो यासाठी बोलला नव्हता की, त्याला गरीबांची चिंता होती पण
यासाठी की तो चोर होता व त्याच्याजवळ त्यांची पिशवी असे; त्यात जे काही
घातले जात असे, तो काढून घेत असे. 7 येशू म्हणाले, "तिला राहू दया बरे!'
मला ज्या दिवशी पुरले जाईल, त्या दिवसासाठीच तिने असे केले आहे, 8 कारण
गरीब तुमच्याबरोबर सर्वदा राहतील परंतु मी तुमच्यासोबत नेहमी राहणार
नाही." 9 यहूदयांपैकी सर्वसामान्य लोकांना कळले की, येशू तेथे आहेत आणि
लोक केवळ येशूंसाठीच नव्हे तर, ज्या लाजराला येशूंनी मेलेल्यांतून उठवले
होते त्याला पाहाता यावे, यासाठीही आले होते. 10 म्हणून मुख्य याजकाने
लाजराला सुद्धा मारण्याची योजना आखली 11 कारण त्याच्यामुळे बहुतेक
यहूदी, येशूंवर विश्वास ठेवू लागले. 12 दुसऱ्या दिवशी सणाला आलेल्या पुष्कळ
लोकांनी असे ऐकून की, येशू यरूशलेमेस येणार आहेत, 13 खजुरीच्या झावळया
घेतल्या व येशूंना भेटण्यास निघाले; ते मोठयाने घोषणा करू लागले, 'होसान्ना!

धन्य इस्राएलाचे राजे, जे प्रभूंच्या नांवाने येतात!" 14 येशूंना गाढवीचे एक
शिंगरू (पिलू) मिळाले व ते त्याच्यावर बसले; 15 जसे लिहिले आहे, 'सीयोनेच्या
कन्ये (इस्राएली लोक) भिऊ नको, पाहा, तुझे राजे गाढवीच्या शिंगरावर
बसून येत आहेत!' 16 त्याचे शिष्य, प्रथम, या गोष्टी समजले नव्हते, पण जेव्हा
येशूंचे गौरव प्रगट झाले तेव्हा त्यांना आठवले की या गोष्टी त्यांच्याविषयीच
लिहिलेल्या होत्या आणि लोक त्यांच्याशी तसेच वागले होते. 17 मग गर्दीतील
लोकांनी, जे त्यासमयी येशूंबरोबर होते अशी साक्ष दिली की, येशूंनी लाजराला
कबरेतून बोलावून, मेलेल्यांतून जिवंत केले होते. 18 याच कारणामुळे लोक
त्यांना भेटावयास आले होते, कारण त्यानी ऐकले होते की येशूंनी असे
आश्चर्यकर्म प्रगट केले होते. 19 म्हणून परूशी आपसांत म्हणू लागले, 'जरा
विचार करा की, 'तुम्ही काहीएक करू शकणे, केवळ अशक्य झाले आहे'; पाहा,
जग येशूंवर विश्वास ठेवू लागले आहे.' 20 त्या सणात, भजनगायन करावयास
आलेल्या लोकांमध्ये अनेक ग्रीक लोक होते. 21 गालीलातील बेथसैदा येथे
राहणाऱ्या फिलिप्पाकडे येऊन त्यानी त्याला विनंती केली की, 'महोदय, आम्ही
येशूंना भेटू इच्छीतो.' 22 फिलिप्पाने येऊन अंद्रियाला त्याविषयी सांगितले, मग
त्या दोघांनी ही खबरबात येशूंना सांगितली. 23 त्या समयी येशू त्यांना म्हणाले,
"आता 'नेमका समय' येऊन ठेपला आहे की मनुष्याच्या पुत्राची महिमा व्होवी."
24 मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो, जोवर गव्हाचा दाणा जमिनीत पडून मरून
जात नाही तोवर तो एकटाच राहातो पण जेव्हा तो मरतो तेव्हा बहुत फळ
देतो. 25 जो तुझे जीवन प्रिय जाणतो, तो ते गमावील; जो या जगात, तुझे
जीवन अप्रिय जाणतो, तो अनंतजीवनासाठी त्याचे रक्षण करील. 26 जो कोणी
माझी सेवा करू पाहातो त्याने माझ्या मागे यावे व जेथे मी आहे तेथेच माझा
सेवक देखील असेल; जो कोणी माझी सेवा करील, पिता त्याचा आदर करील.
27 आता माझा जीव व्याकुळ होतो आहे, मग मी आता काय बोलू? 28 हे बापा!
आता या विशिष्ट क्षणापासून माझा बचाव कर, पण मी याच कारणाखातर,
या समयापर्यंत पोहचलेलो आहे. बापा! आपल्या नांवाचे गौरव कर"; त्याच
क्षणी अशी आकाशवाणी झाली, "तो गौरव मी केला आहे आणि तो पुन्हा,
आणखी गौरवीन." 29 तेथे उभे राहून ऐकणारे लोक म्हणाले, "मेघ गर्जला, दुसरे
म्हणाले, "कोणी स्वर्गदूत त्यांच्याशी बोलला आहे'. 30 यावर येशू म्हणाले, "हा

शब्द माझ्यासाठी नाहीये पण तुमच्यासाठी झालेला आहे. 31 आता या जगाचा
न्याय होतो आहे, या जगाचा अधिकारी काढून टाकला जाईल. 32 जर मला
पृथ्वीवरून उंच केले तर मी सर्वांना आपल्याकडे ओढून घेईन." 33 असे बोलून
त्यानी याविषयी सांगितले की, ते कोणत्या मरणाने मरणार आहेत. 34 हे ऐकून
लोक त्यांना म्हणाले, 'धर्मशास्त्राची ही बाब आम्ही ऐकली आहे की, मशीहा
सर्वदा राहातील; मग आपण का म्हणता की, मनुष्याच्या पुत्राला उंच केले जाणे
गरजेचे आहे? हा 'मनुष्याचा पुत्र' कोण आहे?' 35 येशू त्यांना म्हणाले, "प्रकाश
आता फक्त थोडा वेळ तुमच्यामध्ये आहे, 36 अंधकाराने तुम्हाला वेढून, झाकून
टाकू नये म्हणून जोवर प्रकाश तुमच्याबरोबर आहे तोवर कायम चालत राहा.
जो अंधकारात चालतो त्याला कळत नाही की, तो कोठे जातो आहे, जोपर्यंत
प्रकाश तुमच्याबरोबर आहे, प्रकाशावर विश्वास करा, यासाठी की तुम्ही
प्रकाशाचे संतान व्हावे." या गोष्टी सांगून येशू निघून गेले आणि त्यांच्यापासून
लपून राहिले. 37 येशूंनी त्या लोकांसमोर इतकी चिन्हें दाखवली तरीही त्यानी
त्यांच्यावर विश्वास ठेवला नाही; 38 यासाठी की, यशया संदेष्टयाचे ते वचन
पूर्ण व्हावे जे त्याने म्हटले, "प्रभुजी, आमचा समाचार कोणी मान्य केला
आहे? व प्रभूंचे भुजबळ कोणावर प्रगट झाले आहे?" 39 याच कारणामुळे ते
विश्वास करू शकले नाहीत कारण यशयाने पुन्हा म्हटले 40 की, त्याने त्याचे
डोळे आंधळे आणि त्याचे मन कठोर केले जेणेकरून असे होता कामा नये
की, त्यानी डोळयांनी पाहावे, मनाने समजावे, वळावे आणि मी त्यांना बरे
करावे. 41 यशया या गोष्टी अशासाठी बोलला कारण त्याने येशूंची महिमा
पाहिली होती व तो त्यांच्याविषयी बोलला होता. 42 अधिकाऱ्यंापैकी अनेक
लोकांनी येशूंवर विश्वास ठेवला परंतु परूश्यांमुळे ते उघडपणे तसे कबूल करत
नव्हते कारण त्यांना आराधनालयातून बाहेर काढण्यात आले असते. 43 कारण
मनुष्याची प्रशंसा त्यांना परमेश्वराच्या प्रशंसेपेक्षा अधिक प्रिय वाटत होती.
44 येशू मोठयाने म्हणाले, "जो माझ्यावर भरंवसा ठेवतो तो माझ्यावर नव्हे तर,
मला पाठवणाऱ्या परमेश्वरावर भरंवसा ठेवतो. 45 जो मला पाहातो तो त्या
परमेश्वराला पाहातो ज्याने मला पाठवले आहे. 46 मी जगाचा प्रकाश होऊन
आलो आहे यासाठी की, जो कोणी माझ्यावर विश्वास ठेवतो त्याने अंधारात
राहू नये. 47 जर कोणी माझे वचन ऐकून ते मान्य करत नसेल, त्याला मी दोषी

ठरवत नाही कारण मी जगाला दोषी ठरवण्यासाठी नव्हे, पण त्याचा उद्धार
करण्यासाठी आलो आहे. 48 जो मला तुच्छ लेखतो व माझी वचनें स्वीकार करत
नाही त्याला दोषी ठरवणारे एक आहेः अर्थात ते वचन जे मी सांगितले आहे.
तेच वचन, शेवटल्या दिवशी त्याला दोषी ठरवील; 49 कारण मी आपल्याकडून
हे सर्व बोललो नाहीये परंतु पित्याकडून, ज्याने मला पाठवले आणि आज्ञा दिली
की मी, काय काय बोलावे. 50 मला ठाऊक आहे की, पित्याची आज्ञा अनंत
जीवन आहे म्हणून मी तसेच बोलतो जसे पित्याने मला सांगितले आहे.

13 1 वल्हांडणाच्या सणापूर्वी येशूंनी जाणून घेतले की, माझा तो समय
आलेला आहे की मी, जग सोडून पित्याजवळ जावे, म्हणून येशू
जगातील आपल्या लोकांवर जसे प्रेम करत होते, तसेच प्रेम शेवटपर्यंत करत
राहिले. 2 भोजन संपताच, सैतान शिमोनाचा मुलगा यहूदा इस्कर्योत याच्या
मनात, येशूंना धरून देण्याचा विचार घालून चुकला होताच. 3 तेव्हा या
आश्वासनासह की, परमेश्वर बापाने सर्वकाही त्यांच्या हाती दिलेले आहे व
ते परमेश्वरापासून आले आहेत आणि परमेश्वराकडे जाणार आहेत, 4 येशूंनी
आपला झगा काढला, पंचा (टॉवेल) आपल्या कमरेला बांधला. 5 मग पात्रात
पाणी भरून ते शिष्यांचे पाय धुऊन त्याच पंच्याने पुसू लागले. 6 जेव्हा येशू
शिमोन पेत्राजवळ आले तेव्हा तो त्यांना म्हणाला, "प्रभुजी, आपण माझे पाय
धुऊ इच्छीता काय?" 7 येशूंनी उत्तर दिले, "जे मी करतो आहे ते तुला ठाऊक
नाहीये परंतु काही समयानंतर समजेल." 8 पेत्र त्यांना म्हणाला, "मी माझे पाय
आपल्याला कधीच धुऊ देणार नाही; ते ऐकून येशू त्याला म्हणाले, "जर मी
तुला धुतले नाही तर, तुझ्याबरोबर माझे कोणतेही नाते नाहीये." 9 शिमोन पेत्र
त्यांना म्हणाला, 'प्रभुजी, मग माझे पायच नाही तर हात व डोकेही धुवा"
10 येशू त्याला म्हणाले, "ज्याचे स्नान झालेलेच आहे त्याला पायांखेरीज काही
धुण्याची आवश्यकता नाहीये, तो अगदी स्वच्छ आहे आणि तुम्ही सर्व शुद्ध
आहात. परंतु सगळेच मात्र नाही". 11 त्यांना धरून देणारा कोण आहे ते येशू
ओळखत होते म्हणून ते म्हणाले तुम्ही सगळेच नाही. 12 शिष्यांचे पाय धुऊन
झाले तेव्हा येशूंनी झगा घातला व ते पुन्हा बसले; येशू त्यांना म्हणू लागले,
"मी तुमच्याबरोबर काय केले (वागलो) आहे? 13 तुम्ही मला गुरू म्हणता, प्रभु

म्हणता, ठीक वागता कारण, मी तोच आहे. 14 जर मी प्रभु आणि गुरू असूनही
तुमचे पाय धुतले तर तुम्हीही एकमेकांचे पाय धुवावेत, 15 कारण मी तुमच्यापुढे
नमूना ठेवलेला आहे यासाठी की जसे मी तुमच्याशी वागलो तसेच तुम्ही सुद्धा
करत राहावे. 16 मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, दास आपल्या स्वामीपेक्षा
श्रेष्ठ नाहीये व पाठवलेला आपल्या पाठवणाऱ्यापेक्षा थोर नाहीये. 17 तुम्ही या
सर्व गोष्टी जाणता, मग जर त्याचे पालन देखील केले तर तुम्ही आशीर्वादीत
आहा. 18 मी तुम्हा सर्वांविषयी बोलत नाहीये, ज्यांना मी निवडलेले आहे
त्यांना मी जाणतोच पण असे यासाठी झाले की, पवित्रशास्त्रातील (बायबल) ही
बाब पूर्ण व्हावी की, जो माझी भाकर खातो त्यानेच माझ्यावर लाथ उगारली
(लाथाडले) आहे. 19 असे होण्याआधी, आता मी, तुम्हाला सावध करतो,
जेणेकरून जेव्हा असे होईल तेव्हा तुम्ही विश्वास ठेवावा की मी तोच आहे.
20 मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की मला पाठवणाऱ्याला जो स्वीकारतो, तो
माझा स्वीकार करतो, तसेच तो ज्याने मला पाठवले त्याचाही स्वीकार करतो".
21 असे बोलून, येशू आत्म्यात अस्वस्थ झाले व त्यानी अशी ग्वाही (साक्ष) दिली
की, मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, तुमच्यापैकी एकजण मला धरून
देईल. 22 येशू कोणाविषयी असे बोलत आहे या संशयाने शिष्य, एकमेकांकडे
पाहू लागले. 23 येशूंच्या शिष्यांपैकी एक, ज्याच्यावर त्याचे प्रेम होते, त्यांच्या
उराशी टेकून बसलेला होता. 24 तेव्हा शिमोन पेत्राने त्याला इशारा केला
की, त्याने प्रभुंना विचारावे की, ते कोणाविषयी बोलत आहेत. 25 येशूंच्या
उराशी टेकूनच त्या शिष्याने त्यांना विचारले, "प्रभुजी, तो कोण आहे?" येशू
म्हणाले, "मी ज्याला हा भाकरीचा तुकडा बुचकळून देईन, तोच आहे." 26 मग
त्यानी तुकडा बुचकळून, शिमोनाचा मुलगा, यहूदा इस्कर्योत याला दिला.
27 तुकडा घेताच (त्या क्षणीच) सैतान त्याच्या आत शिरला; तेव्हा येशू त्याला
म्हणाले, "जे तू करतोस ते लगेच कर. 28 परंतु बसलेल्यंापैकी कोणालाच
कळले नाही की, येशू त्याला असे का बोलले असावे. 29 यहूदाजवळ पिशवी
असे, म्हणून काहींना वाटले की, जे काही सणासाठी विकत घ्यावयाचे आहे
किंवा गरीबांना दयावयाचे आहे ते, देण्याविषयीचे येशू सांगत आहे. 30 तेव्हा
तुकडा घेऊन तो ताबडतोब बाहेर गेला व हा रात्रीचा समय होता. 31 जेव्हा तो
बाहेर निघून गेला तेव्हा येशू (बाकी अकरांना) म्हणाले, "मनुष्याचा पुत्राची

महिमा झाली आहे आणि परमेश्वराची महिमा देखील त्याच्याठायी झाली आहे;
[32] परमेश्वर पिता सुद्धा स्वतः ठायी त्याची महिमा करील नव्हे ताबडतोब
करील. [33] मुलांनो, मी आणखी थोडा वेळ तुमच्याजवळ आहे, तुम्ही मला
शोधाल व ज्याप्रमाणे मी यहूदयांना सांगितले होते की, "जेथे मी जातो आहे तेथे
तुम्ही येऊ शकत नाही तसेच आता मी तुम्हालाही सांगतो आहे. [34] मी तुम्हाला
एक नवीन आज्ञा देतो, ती ही की "एकमेकांवर प्रेम करा. जसे मी तुमच्यावर
प्रेम केले तसेच तुम्हीही एकमेकांवर प्रेम करा. [35] आपसांत प्रेम राखून ठेवलेले
असेल तर, त्याद्वारेच सवरंना कळेल की तुम्ही माझे शिष्य आहात." [36] शिमोन
पेत्र त्यांना म्हणाला, "प्रभुजी, आपण कोठे जात आहा?" येशू म्हणाले, "जेथे
मी जातो आहे तेथे, आता तू माझ्यामागे येऊ शकत नाही, पण यानंतर मात्र
तू माझ्यामागे येशील." [37] पेत्र त्यांना म्हणाला, "हे प्रभुजी, मी आपल्यामागे
आता का येऊ शकत नाही? मी तर आपल्यासाठी, आपला प्राण देखील देईन."
[38] येशूंनी उत्तर दिले, "तू माझ्यासाठी आपला प्राण देशील काय? मी तुला सत्य
सत्य सांगतो की, कोंबडा आरवण्यापूर्वीच तू मला तीन वेळा नाकारशील."

# 14

[1] तुमचे मन घाबरू नये, तुम्ही परमेश्वरावर भरंवसा ठेवता, माझ्यावर
सुद्धा विश्वास ठेवा. [2] माझ्या पित्याच्या घरी राहण्याच्या बहुत जागा
आहेत; जर राहण्याच्या त्या जागा नसत्या तर मी तुम्हाला तसे सांगितले असते,
कारण तुमच्यासाठी राहावयाचे ते स्थान तयार करण्यास, मी जातो आहे. [3] जर
मी जाऊन तुमच्यासाठी जागा तयार केली तर, पुन्हा येऊन तुम्हाला आपल्या
येथे घेऊन जाईन; यासाठी की जेथे मी राहीन तेथे तुम्ही देखील माझ्याबरोबर
राहावे. [4] जेथे मी जातो तेथील मार्ग तुम्ही जाणता." [5] थोमा त्यांना म्हणाला,
"प्रभुजी, आम्हाला माहित नाहीेये की आपण कोठे जात आहा, मग मार्ग
कसा जाणून घेणार?" [6] येशू त्याला म्हणाले, "मार्ग व सत्य आणि जीवन मीच
आहे; माझ्याद्वारे आल्याशिवाय कोणी पित्याजवळ पोहंचू शकत नाही. [7] जर
तुम्ही मला ओळखले असते तर माझ्या पित्याला सुद्धा ओळखले असते आणि
आता तुम्ही त्यांना ओळखता व त्यांना पाहिले देखील आहे." [8] फिलिप्प त्यांना
म्हणाला, "प्रभुजी, आम्हास पिता पाहावयाचा आहे; हेच आम्हाला पुरेसे आहे."
[9] येशू त्याला म्हणाले, "फिलिप्पा, इतके दिवस मी तुमच्याबरोबर आहे तरीही

तू मला ओळखत नाही काय? ज्याने मला पाहिले आहे त्याने पित्याला पाहिले
आहे; तू का म्हणतो की आम्हाला पिता पाहावयाचा आहे? 10 तू विश्वास ठेवत
नाही काय की, मी पित्यामध्ये आणि पिता माझ्यामध्ये आहे? या गोष्टी ज्या मी
तुम्हाला सांगतो आहे, आपल्यातर्फे सांगत नाहीये पण पिता माझ्यामध्ये राहून
तुझे कार्य करतो. 11 माझ्यावरच विश्वास ठेवा की, मी पित्याठायी आणि पिता
माझ्याठायी आहे नाहीतर निदान माझ्या कृत्यांवरून तरी माझ्यावर विश्वास
धरा. 12 मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, जो माझ्यावर विश्वास ठेवतो तो
देखील तीच कृत्यें करील जी मी करतो किंबहूना त्यांच्यापेक्षाही महान कृत्यें
करील कारण, मी पित्याजवळ जातो आहे. 13 जे काही तुम्ही, माझ्या नांवाने
मागाल, मी तेच करीन, जेणेकरून पुत्राद्वारे पित्याची महिमा व्हावी. 14 माझ्या
नांवाने जर तुम्ही काही मागितले तर मी ते करीन. 15 जर तुम्ही माझ्यावर प्रेम
करत आहात तर, माझ्या आज्ञा मान्य कराल (पाळाल). 16 मी पित्याला विनंती
करीन व तो तुम्हाला आणखी एक साहाय्यक देईल यासाठी की, त्याने नेहमी
तुमच्याबरोबर राहावे; 17 अर्थात सत्याचा आत्मा, जो जग प्राप्त करू शकत
नाही कारण, जग त्याला पाहात नाही व ओळखत देखील नाही. तुम्ही त्याला
ओळखता कारण, तो तुमच्याबरोबर राहातो आणि तो तुमच्यामध्ये असेल.
18 मी तुम्हाला बिनसांत्वनाचे असे (दिलासा देत राहीन) सोडणार नाही मी
तुमच्याजवळ येतो आहे. 19 आणखी थोडा वेळ राहिलेला आहे की, त्यानंतर
जग मला पाहणार नाही परंतु तुम्ही मला पाहाल; मी जिवंत आहे म्हणून तुम्ही
सुद्धा जिवंत राहाल. 20 त्या दिवशी तुम्ही समजून घ्याल की, मी आपल्या
पित्यामध्ये आणि तुम्ही माझ्यामध्ये व मी तुमच्यामध्ये आहे. 21 ज्याच्याजवळ
माझ्या आज्ञा आहेत व जो त्या आज्ञांचे पालन करतो केवळ तोच माझ्यावर
प्रेम करतो. जो माझ्यावर प्रेम करतो, त्याच्यावर माझा पिता प्रेम करतो,
मी सुद्धा त्याच्यावर प्रेम करतो आणि स्वतःला त्यावर प्रगट करीन." 22 त्या
यहूदाने जो इस्कर्योत नव्हता येशूंना म्हटले, 'प्रभु, असे का की, आपण स्वतःला
आमच्यावर प्रगट करू इच्छीता पण जगाला नाही?' 23 येशू त्याला म्हणाले,
'जो कोणी माझ्यावर प्रेम करील, तो माझी वचनें पाळील (मानील); माझा
पिता त्याच्यावर प्रेम करील, आम्ही त्याच्याकडे येऊ आणि त्याच्याबरोबर
राहू. 24 जो माझ्यावर प्रेम करत नाही तो माझे वचन मान्य (पाळीत) करत

नाही. जे वचन तुम्ही ऐकता ते माझे नव्हेच मुळी पण पित्याचे आहे ज्याने मला
पाठवले आहे. 25 या गोष्टी मी तुमच्याबरोबर राहतांना तुम्हाला सांगितल्या
आहेत. 26 परंतु साहाय्यक अर्थात पवित्र आत्मा जो पिता माझ्या नांवाने
पाठवील तो तुम्हाला सर्व सर्व शिकवील; जे काही मी तुम्हाला सांगितले त्या
गोष्टींची तुम्हाला आठवण करून देईल. 27 मी तुम्हाला शांति देऊन जातो आहे,
होय, आपली शांति तुम्हाला देतो आहे, जग देते तशी शांति, मी तुम्हाला देत
नाही. तुमचे मन घाबरता कामा नये आणि व्याकुळ होऊ नये. 28 तुम्ही ऐकले
की, मी तुम्हाला सांगितले की मी जातो व तुमच्याकडे पुन्हा येतो आहे. जर
तुम्ही माझ्यावर प्रेम केले असते तर, या गोष्टीमुळे आनंदी झाला असता की मी
पित्याकडे जातो आहे कारण पिता माझ्यापेक्षा महान आहे. 29 तसे होण्यापूर्वीच
मी तुम्हाला सांगितलेले आहे की, जेव्हा असे होऊन जाईल, तेव्हा तुम्ही
विश्वास करा. 30 यापुढे मी तुमच्याबरोबर आणखी अधिक बोलणार नाहीये
कारण या जगाचा सत्ताधीश येतो आहे व माझ्यामध्ये त्याचा काहीही अंश
(भाग) नाहीच मुळी. 31 परंतु असे यासाठी होते आहे की जगाने ओळखून घ्यावे
की, मी पित्यावर प्रेम करतो आणि ज्याप्रकारे पित्याने मला आज्ञा दिली, अगदी
तसेच करतो. उठा, येथून जाऊ या."

# 15

1 द्राक्षाचा खराखुरा वेल मी आहे व माझा पिता द्राक्षें वाढवणारा
आहे. जी फांदी माझ्यामध्ये असून फळ देत नाही, तो ती कापून
टाकतो. जी फांदी फळ देते, तिने भरघोस फळें दयावी म्हणून तो तिची
काटछाट करतो; 3 जी वचनें मी तुम्हाला सांगितली त्यामुळे तुम्ही शुद्ध आहा.
4 तुम्ही माझ्यामध्ये राहा आणि मी तुमच्यामध्ये राहीन. फांदी द्राक्षलतेत
राहिली नाही तर, ती आपसुकच फळ देऊ शकत नाही, त्याचप्रमाणे तुम्ही
सुद्धा जर माझ्यामध्ये राहिला नाही तर फलद्रुप (फळास येणे) असू शकत
नाही. 5 मी द्राक्षाचा वेल आहे, तुम्ही फांदया आहा. जो माझ्यामध्ये राहातो व
मी त्याच्यामध्ये, तो बहुत फळ देतो. माझ्यापासून वेगळे राहून तुम्ही काही
सुद्धा करू शकत नाही. 6 जर कोणी माझ्यामध्ये कायम राहिला नाही तर तो
फांदीसारखा फेकून देण्यात येतो आणि वाळून जातो. मग लोक त्या डहाळ्या
गोळा करून अग्नीत फेकतात व त्या जळून जातात. 7 जर तुम्ही माझ्यामध्ये

स्थिरावला व माझी वचनें तुमच्यामध्ये टिकून राहिली तर, हवे ते मागा आणि
ते तुमच्यासाठी होऊन जाईल. 8 माझ्या पित्याची महिमा यामुळे होते की तुम्ही
विपुल फळ दयावे, तेव्हाच तुम्ही माझे शिष्य व्हाल (ठराल). 9 जसे पित्याने
माझ्यावर प्रेम केले तसेच मी देखील तुमच्यावर प्रेम केले आहे. माझ्या प्रेमात
तुम्ही दृढ राहा. 10 जसे मी माझ्या पित्याच्या आज्ञा पाळून त्याच्या प्रेमात
कायम राहातो तसेच तुम्हीही माझ्या आज्ञा पाळल्या तर, माझ्या प्रेमात स्थिर
राहाल. 11 या गोष्टी मी तुम्हाला यासाठी सांगितल्या आहेत जेणेकरून माझा
आनंद तुम्हांमध्ये टिकून राहावा व तुमचा आनंद पूर्ण व्हावा. 12 माझा आदेश
असा आहे की, जसे मी तुमच्यावर प्रेम केले, तसेच प्रेम तुम्ही सुद्धा एकमेकांवर
करा. 13 एखादयाने आपल्या मित्रांसाठी आपला प्राण दयावा यापेक्षा थोर प्रेम
कोणाचे नाहीच मुळी. 14 ज्या गोष्टींचा आदेश मी तुम्हाला देतो आहे, त्या
तुम्ही केल्या तर, तुम्ही माझे मित्र आहा. 15 यापुढे मी तुम्हाला दास म्हणणार
नाही कारण दासाला जाणीव नसते की, त्याचा स्वामी काय करतो आहे; मी
तुम्हाला मित्र म्हटलेले आहे कारण माझ्या पित्यापासून ज्या गोष्टी मी ऐकल्या
त्या सर्व तुम्हास सांगितल्या आहेत. 16 तुम्ही मला निवडले नाही परंतु मी
तुम्हास निवडलेले आहे व नेमून दिलेले आहे की, तुम्ही जाऊन फळ दयावे व
तुमचे फळ टिकून राहावे यासाठी की, जे काही तुम्ही, माझ्या नांवाने पित्यास
मागाल, त्याने तुम्हाला दयावे 17 या गोष्टींची आज्ञा मी तुम्हाला यासाठी
देतो की, तुम्ही एकमेकांवर प्रेम करावे. 18 जर जग तुमच्याशी वैर करते तर,
तुम्हाला ठाऊक आहे की त्याने तुमच्याआधी माझ्याशीही वैर केले. जग,
आपल्या लोकांवर प्रेम करते. 19 तुम्ही जगाचे असता तर, त्याने तुमच्यावर
प्रेम केले असते; तुम्ही जगाचे नाही, पण मी तुम्हाला जगातून निवडले आहे
म्हणून ते तुमच्याशी वैर करते. 20 मी तुम्हाला सांगितले होते की, दास आपल्या
स्वामीपेक्षा श्रेष्ठ नसतो, ते वचन नेहमी स्मरणी असू दया. जर त्यानी मला
छळले आहे तर, तुम्हालाही छळतील; जर त्यानी माझे वचन मान्य केले तर,
तुमचे सुद्धा करतील. 21 परंतु असे सर्वकाही ते माझ्या नांवामुळे तुमच्याशी
करतील कारण, मला पाठवणाऱ्या परमेश्वराला ते ओळखत नाही. 22 मी आलो
नसतो व त्यांच्याशी बोललो नसतो तर, ते दोषी ठरले नसते; आता त्यांना
त्यांच्या पापासाठी कोणताही बहाणा नाहीये. 23 जो माझ्याशी वैर करतो तो

माझ्या पित्याशी सुद्धा वैर करतो. 24 मी त्यांच्यामध्ये जर, ती कार्यें केली नसती
जी इतर दुसऱ्याने केली नाही, तर ते दोषी ठरले नसते पण आता त्यानी मला व
माझ्या पित्याला (दोघांनाही) पाहिले आहे आणि दोघांशीही वैर केले. 25 असे
यास्तव झाले की, ते वचन पूर्ण व्हावे जे त्यांच्या धर्म पुस्तकात लिहिले आहे की,
"काही कारण नसतांनाही त्यानी माझ्याशी वैर केले." 26 परंतु ज्यासमयी तो
साहाय्यक जो मी तुमच्याकडे पाठवीन, अर्थात सत्याचा आत्मा जो पित्यापासून
येतो, त्यासमयी तो माझी साक्ष देईल. 27 तुम्हीही साक्षीदार आहा कारण,
तुम्ही आरंभापासून माझ्याबरोबर राहिला आहा.

# 16

1 "या गोष्टी मी तुम्हाला यासाठी सांगितल्या जेणेकरून तुम्ही अडखळू
नये. 2 ते तुम्हाला आराधनालयातून काढून टाकतील नव्हे तो समय
येतो आहे की, जो कोणी तुम्हास जिवे मारील तो असा विचार करील की,
तो परमेश्वराची सेवा करतो आहे. 3 असे ते यासाठी करतील कारण, त्यानी
पित्याला व मला सुद्धा ओळखले नाहीये, 4 परंतु या गोष्टी मी तुम्हाला यास्तव
सांगितल्या की जेव्हा त्याचा समय येईल तेव्हा तुम्हाला आठवण व्हावी की मी
याविषयी आधी सांगितलेच होते. प्रारंभी मी तुम्हाला या गोष्टी सांगितल्या
नाही कारण तेव्हा मी तुमच्याबरोबर होतो. 5 आता मी, मला पाठवणाऱ्याकडे
जातो आहे व तुमच्यापैकी कोणी मला विचारत नाही की, मी कोठे जातो
आहे! 6 पण मी, या ज्या गोष्टी तुम्हाला सांगितल्या त्यामुळे, शोकाने तुमचे
अंतःकरण भरून गेले आहे. 7 तरीपण मी तुम्हाला खरेखरे सांगतो की माझे जाणे
तुमच्यासाठी चांगले आहे; जर मी गेलो नाही तर, तो साहाय्यक तुमच्याकडे
येणार नाही, पण जर गेलो तर, मी तो तुमच्याकडे पाठवीन. 8 तो येऊन जगाला
पाप, नीतिमत्व व न्याय याविषयी दोषी ठरवील. 9 पापाविषयी यासाठी की,
ते माझ्यावर विश्वास ठेवत नाही 10 आणि नीतिमत्वाविषयी (धार्मिकता)
यासाठी कारण मी पित्याकडे जातो आहे. तुम्ही मला पुन्हा पाहणार नाही. 11 व
न्यायाविषयी यासाठी की, जगाचा सत्ताधारी, दोषी ठरवण्यात आला आहे.
12 मला तुम्हाला आणखी पुष्कळ गोष्टी सांगावयाच्या आहेत, परंतु आता तुम्ही,
त्या सहन करू शकणार नाही. 13 पण जेव्हा तो अर्थात सत्याचा आत्मा येईल
तेव्हा तुम्हाला सर्वकाही शिकवील कारण तो आपल्या स्वतःतर्फे सांगणार नाही

परंतु जे काही ऐकेल तेच सांगेल व पुढे घडणाऱ्या गोष्टींविषयी तुम्हाला सांगेल.
14 तो माझी महिमा करील, कारण तो माझ्यातून घेऊन तुम्हाला सांगेल. 15 जे
काही पित्याचे आहे ते सर्व माझे आहे म्हणून मी म्हटले की, जे माझे आहे
त्यातून घेऊन, तो तुम्हाला सांगेल. 16 थोडया समयानंतर तुम्ही मला पाहणार
नाही पण पुन्हा थोडया समयानंतर तुम्ही मला पाहाल." 17 मग त्याचे अनेक
शिष्य आपसांत म्हणाले, "ही काय गोष्ट आहे की, ते आम्हाला म्हणतात की,
थोडया वेळाने तुम्ही मला पाहणार नाही पण पुन्हा थोडया वेळाने तुम्ही मला
पाहाल? आणि असे यासाठी की मी पित्याकडे जातो आहे? 18 मग ते म्हणाले,
थोडया वेळाने याचा अर्थ काय आहे? आम्हाला ठाऊक नाही की त्यांना काय
म्हणावयाचे आहे." 19 शिष्य मला काही विचारू इच्छीत आहेत, हे ओळखून
येशू त्यांना म्हणाले, "थोडया वेळाने तुम्ही मला पाहणार नाही परंतु पुन्हा
थोडया वेळाने मला पाहाल; माझ्या या गोष्टीविषयी तुम्ही आपसांत विचारपूस
करत आहा काय?" 20 मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, तुम्ही रडाल, विलाप
कराल पण जग मात्र आनंद करील. तुम्हाला शोक होईल परंतु तुमचा शोक
आनंदात बदलून जाईल. 21 ज्यावेळी बाळाला जन्म देण्याचा, स्त्रीचा समय
येतो त्यावेळी तिला वेदना होतात कारण, तसे व्हावयाचेच असते. मग बाळ
जन्मतो तेव्हा, जगात एका मनुष्याचा जन्म झाला या आनंदाने, ती स्त्री तुझे
कष्ट पुन्हा आठवत नाही. 22 तुम्हीही आता दुःखी आहा पण मी तुम्हाला पुन्हा
भेटेन आणि तुमचे मन आनंदी होईल, तुमचा हा आनंद तुमच्यापासून कोणीही
हिरावून घेऊ शकणार नाही. 23 त्या दिवशी तुम्ही मला काही विचारणार नाही
पण मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, जर पित्यास काही मागाल तर, तो
माझ्या नांवाने तुम्हाला देईल. 24 अदयाप माझ्या नांवाने तुम्ही काही मागितले
नाहीये; मागाल तर मिळेल, यासाठी की तुमचा आनंद पूर्णत्वास जावा. 25 मी
या गोष्टी तुम्हाला दृष्टांताने सांगितल्या परंतु तो समय येतो आहे की, यापुढे
मी तुम्हाला दृष्टांताद्वारे सांगणार नाही पण स्पष्ट रुपाने तुम्हाला पित्याविषयी
सांगेन. 26 त्या दिवशी तुम्ही माझ्या नांवाने मागाल; मी असे म्हणत नाहीये
की मी तुमच्यासाठी पित्याशी विनंती करीन, 27 पिता स्वतःच तुमच्यावर प्रेम
करतो कारण, तुम्ही माझ्यावर प्रेम करता व असा विश्वासही केला आहे की, मी
पित्यापासून आलो आहे. 28 मी पित्यापासून निघून जगात आलो आहे, परत

जग सोडून पित्याजवळ जातो आहे. 29 येशूंचे शिष्य म्हणाले, "पाहा, आता
आपण स्पष्ट व उघड बोलत आहा आणि दृष्टांताने काही बोलत नाहीये. 30 आता
आम्हाला खात्रीने कळले आहे की, आपण सर्व काही जाणता, कोणी आपणाला
विचारावे हे आवश्यक नाहीये; यावरून आम्ही असे मान्य करतो की, आपण
परमेश्वरापासून आहा." 31 असे ऐकून येशू त्यांना म्हणाले "तुम्ही आता भरंवसा
ठेवता काय?" 32 पाहा, तो समय येतो आहे, किंबहुना येऊन ठेपलेला आहे की,
तुम्ही सर्व इकडेतिकडे पांगून जाल आणि आपआपल्या मार्गाने निघून जाल व
मला एकटे सोडाल, पण मी एकटा नाहीये कारण पिता माझ्याबरोबर आहे.
33 या गोष्टी मी तुम्हाला, यासाठी सांगितल्या की माझ्यामध्ये, तुम्हाला शांति
मिळावी. जगात तुम्हाला क्लेश होतो आहे परंतु धीर धरा, मी जग जिंकून
घेतले आहे.

17 1 या सर्व गोष्टी बोलल्यानंतर येशूंनी आपली दृष्टि आकाशाकडे (वर)
लावून म्हटले, "हे बापा, तो समय आलाच आहे, आता आपल्या पुत्राचे
गौरव कर यासाठी की पुत्रानेही तुझे गौरव करावे; 2 कारण तू त्याला सर्व
मनुष्यांवर अधिकार (ताबा) दिला आहे व ते यासाठी की, जे तू त्याला दिलेले
आहे, त्या सर्वांना त्याने अनंत जीवन दयावे. 3 अनंत जीवन हेच आहे की, तू
जो सर्वश्रेष्ठ व एकमेव सत्य परमेश्वर आहे व येशू (ख्रिस्त) मशीहा, ज्याला तू
पाठवलेले आहे, त्यानी त्याला ओळखावे. 4 जे कार्य तू मला करावयास दिले
होते ते पूर्ण करून, मी पृथ्वीवर तुला आदर दिला आहे. 5 आता बापा, माझे जे
गौरव जगाच्या उत्पत्तिपूर्वी तुझ्याबरोबर होते, तू तुझ्याबरोबर, त्याच गौरवाने
माझे गौरव कर. 6 मी तुझे नांव 'त्या' लोकांवर प्रगट केले जे जगातून तू मला
दिले आहेत. ते तुझे होते व तू ते मला दिलेत आणि त्यानी तुझे वचन मान्य
करून त्याचे पालन केले आहे. 7 आता त्यांना कळले आहे की जे काही तू मला
दिलेले आहे ते सर्व तुझ्यातर्फेच आहे. 8 कारण जी वचनें (शब्द) तू मला दिली,
तीच वचनें मी त्यांना दिली आहेत व त्यानी ती स्वीकार केली आहेत; त्यानी
खरोखर जाणले आहे की, मी तुझ्यापासून आहे तसेच त्यानी विश्वास ठेवला की,
तूच मला पाठवलेले आहे. 9 बापा, मी संपूर्ण जगासाठी विनंती करत नाहीये,
केवळ त्यांच्यासाठीच जे तू मला दिलेले आहेत कारण ते तुझे आहेत. 10 जे काही

माझे आहे, ते सर्व तुझे आहे व जे तुझे आहे ते माझे आहे; त्यांच्याद्वारे माझे
गौरव प्रगट झालेले आहे. 11 मी यापुढे जगात राहणार (असणार) नाही परंतु ते
जगात राहातील, मी तुझ्याकडे येतो आहे. पवित्र बापा! तुझे ते नांव जे तू मला
दिलेले आहे, त्या नांवात त्याचे रक्षण कर जेणेकरून त्यानी आपल्यासारखे एक
व्हावे. 12 जेव्हा मी त्यांच्याबरोबर होतो तेव्हा मी, तुझ्या त्या नांवाने, जे तू
मला दिले आहे त्याचे रक्षण केले. मी त्यांना राखून ठेवले आणि विनाशाच्या
पुत्राशिवाय त्यांपैकी कोणीही नाश पावला नाही; बायबलचे वचन पूर्ण व्हावे
म्हणून तसे घडले. 13 पण आता मी तुझ्याकडे येतो आहे व या गोष्टी जगात
यासाठीच बोलतो की, त्यानी माझा आनंद स्वतःठायी संपूर्णतः प्राप्त करून
घ्यावा. 14 मी तुझे वचन त्यांच्यापर्यंत पोहंचवलेले आहे; जगाने त्यांच्याशी
वैर केले कारण जसा मी जगाचा नाहीये तसेच ते सुद्धा जगाचे नाहीत. 15 मी
अशी विनंती करत नाहीये की तू त्यांना जगातून काढावे, परंतु माझी याचना
अशी आहे की, त्या दुष्टापासून तू त्याचे रक्षण करावे. 16 जसा मी जगाचा
नाही तसेच तेही जगाचे नाहीत. 17 सत्याद्वारे त्यांना पवित्र कर, तुझे वचन
सत्य आहे. 18 जसे तू मला जगात पाठवले तसेच मीही त्यांना जगात पाठवले.
19 त्यांच्यासाठी मी स्वतःला पवित्र करतो आहे, यासाठी की सत्याद्वारे, ते
सुद्धा पवित्र केले जावेत. 20 मी केवळ यांच्यासाठीच नव्हे पण त्यांच्यासाठीही
विनंती करतो जे यांच्या वचनाद्वारे माझ्यावर विश्वास ठेवतील, जेणेकरून
त्या सर्वांनी एक व्हावे. 21 बापा, जसा तू माझ्यामध्ये आहे व मी तुझ्यामध्ये,
तसेच त्यानीही आपल्यामध्ये एक व्हावे यासाठी की, सर्व लोकांनी विश्वास
करावा की, तू मला पाठवले आहे. 22 तू जे गौरव मला दिले, ते मी त्यांना दिले
आहे जेणेकरून त्यानीही तसेच एक व्हावे, जसे आपण दोघे एक आहोत; 23 मी
त्यांच्यामध्ये आणि तू माझ्यामध्ये यासाठी की, त्यानी सिद्ध होऊन एक व्हावे
आणि जगाला कळावे की, तू मला पाठवले आहे; जसे तू माझ्यावर प्रेम केले
तसेच प्रेम मी देखील त्यांच्यावर केलेले आहे. 24 हे बापा! माझी इच्छा हीच
आहे की, जे तू मला दिले आहेत त्यानी देखील, जेथे मी आहे तेथे माझ्याबरोबर
असावे यासाठी की, त्यानी माझे ते गौरव पाहावे जे तू मला दिले आहे, कारण
जगाच्या उत्पत्तिपूर्वी, तू माझ्यावर प्रेम केले. 25 हे महापवित्र (नीतिसमृद्ध)
बापा, जगाने तुला ओळखले नाही पण मी तुला जाणले आहे व यांनीही जाणून

घेतले आहे की, तू मला पाठवले आहे. 26 तुझे नांव मी त्यांना कळवले आहे व
कळवीत राहीन यासाठी की, तुझे जे प्रेम माझ्यावर होते, ते प्रेम त्यांच्यामध्ये
असावे आणि मी त्यांच्यामध्ये असावे."

18 1 या गोष्टी बोलल्यानंतर येशू आपल्या शिष्यांसह किद्रोन नाल्याच्या
पलीकडे गेले. 2 त्यांना धरून देणाऱ्या यहूदाला देखील ती जागा
ठाऊक होती, कारण येशू आपल्या शिष्यांबरोबर वारंवार तेथे जात असत.
3 मग यहूदा, सैनिक व प्रमुख याजक आणि परूश्यांकडचे सेवक घेऊन, दिवे,
मशाली आणि हत्यारे घेऊन तेथे आला. 4 तुझे काय केले जाणार आहे याची
जाणीव ठेवून येशू तेथून बाहेर आले, आणि त्यानी, त्या लोकांना विचारले,
"कोणाला शोधता आहा?" 5 ते म्हणाले 'येशू नासरेथकराला.' येशू त्यांना
म्हणाले, "मीच तो आहे." त्यांना धरून देणारा यहूदाही त्यांच्याबरोबर उभा
होता. 6 येशूंनी 'मीच आहे' म्हणताच, ते मागे हटून जमिनीवर पडले. 7 तेव्हा
येशूंनी त्यांना पुन्हा विचारले, "तुम्ही कोणाला शोधत आहा?" 8 ते म्हणाले,
"येशू नासरथेकराला." येशू म्हणाले, "मी तुम्हाला सांगून चुकलो आहे की,
तो मीच आहे, तुम्हाला जर, मीच हवा आहे तर यांना जाऊ दया." 9 असे
यासाठी झाले की, ते वचन पूर्ण व्हावे जे येशू बोलले होते की, जे तू मला दिले
आहेत त्यांच्यातून मी एक सुद्धा हरविला नाहीये. 10 शिमोन पेत्राने आपल्या
जवळची तरवार उपसली आणि प्रमुख याजकाच्या दासावर चालवून त्याचा
उजवा कान उडवला. त्या दासाचे नांव मल्ख असे होते. 11 तेव्हा येशू पेत्रास
म्हणाले, "आपली तरवार म्यानात घाल, जो प्याला पित्याने मला दिला आहे,
काय मी तो पिऊ नये?" 12 तेव्हा सैनिक, त्याचे अधिकारी व यहूदयांच्या
सेवकांनी येशूंना धरून बांधले. 13 प्रथम ते त्यांना, हन्नाकडे घेऊन गेले,
कारण त्या वर्षी प्रमुख याजकाचा अर्थात कयफाचा तो सासरा होता. 14 हा
तोच कयफा होता ज्याने, यहूदयांना सल्ला दिला होता की, आपल्यासाठी
एका मनुष्याने मरणे चांगले आहे. 15 शिमोन पेत्र व आणखी एक शिष्यही
येशूंच्या मागे चालू लागले. हा शिष्य प्रमुख याजकाच्या ओळखीचा होता.
तो येशूंबरोबर प्रमुख याजकाच्या अंगणात गेला. 16 पण पेत्र बाहेर दाराशीच
उभा झाला. मग तो दुसरा शिष्य जो, प्रमुख याजकाच्या परिचयाचा होता,

बाहेर निघाला आणि द्वारपालिकेला सांगून पेत्राला आत घेऊन आला. 17 ती
द्वारपालिका (दासी) पेत्राला म्हणाली, 'तू देखील या माणसाच्या शिष्यंापैकी
आहे काय?' तो म्हणाला, 'मी नाहीये'. 18 दास व सेवक थंडीमुळे, कोळसा
पेटवून, उभे राहून विस्तव शेकत होते. पेत्रही त्यांच्याबरोबर उभा राहून शेकत
होता. 19 तेव्हा प्रमुख याजकाने येशूंशी त्यांच्या शिष्यांविषयी व त्यांच्या
उपदेशाविषयी विचारपूस केली. 20 येशू त्याला म्हणाले, "मी जगाशी उघड
व स्पष्ट बोललो आहे, मी सभेत आणि आराधनालयात, जेथे सर्व यहूदी एकत्र
जमतात नेहमी उपदेश केला आणि गुप्तपणे काहीही बोललो नाहीये. 21 तुम्ही
मला का विचारता, ऐकणाऱ्यांना विचारा की, मी त्यांना काय बोललो?
पाहा, मी जे काही बोललो ते त्यांना ठाऊक आहे. 22 जेव्हा येशू असे बोलले
तेव्हा सेवकांपैकी एकाने, जो जवळ उभा होता, येशूंना एक चपराक (थापड)
मारून म्हटले, 'तू प्रमुख याजकाला अशाप्रकारे उत्तर देतो काय?" 23 येशू
त्याला म्हणाले, "जर मी काही वाईट बोललो आहे तर मला सांग की काय
वाईट बोललो, पण जर बरोबर बोललो आहे तर मला का मारतो?" 24 हन्नाने
येशूंना, बांधलेल्या अवस्थेतच कयफा प्रमुख याजकाकडे पाठवले. 25 मग त्या
लोकांनी पेत्राला विचारले, 'तू देखील त्यांच्या शिष्यांपैकी आहेस ना? त्याने
नकार दिला व म्हणाला, 'मी नाहीये'. 26 प्रमुख याजकाच्या दासंापैकी एक,
जो त्याच्या कुटुंबाचा होता व ज्याचा कान पेत्राने उडवला होता म्हणाला,
'मी तुला येशूंबरोबर बागेत पाहिले नव्हते काय?' 27 पेत्राने पुन्हा नाकारले
व लगेच कोंबडा आरवला. 28 येशूंना ते कयफाकडे किल्ल्यात घेऊन गेले.
सकाळचा समय होता, पण ते स्वतः किल्ल्याच्या आत गेले नाही यासाठी
की अशुद्ध होऊ नये आणि त्यांना वल्हांडणाचे भोजन खाता यावे. 29 मग
पिलात त्यांच्याकडे बाहेर निघून आला आणि म्हणाला, 'तुम्ही ह्या मनुष्यावर
कोणता दोष लावता आहा?' 30 ते म्हणाले, 'जर तो अपराधी नसता तर आम्ही
त्याला आपल्या हाती सोपवले नसते.' 31 पिलात त्यांना म्हणाला, 'तुम्ही
त्याला घेऊन, जा, व आपल्या नियमशास्त्रानुसार त्याचा न्याय करा.' यहूदी
त्याला म्हणाले, 'आम्हाला अधिकार नाहीये की आम्ही एखादयाचा जीव
घ्यावा.' 32 हे अशासाठी झाले की, येशूंचे ते वचन पूर्ण व्हावे जे त्यानी म्हटले
होते अर्थात त्याचे मरण कसे होईल. 33 मग पिलात पुन्हा किल्ल्यात शिरला

आणि येशूंना बोलावून म्हणाला, 'तू यहूदयांचा राजा आहेस काय?' 34 येशू
उत्तर देत म्हणाले, "ही गोष्ट आपण स्वतः होऊन म्हणता किंवा दुसऱ्यांनी
माझ्याविषयी आपल्याला तसे सांगितले?" 35 पिलाताने उत्तर दिले, 'मी यहूदी
आहे काय? तुझ्या जातीच्या लोकांनीच आणि प्रमुख याजकांनी तुला माझ्या
हाती सोपवलेले आहे; तू असे काय केले आहेस?' 36 येशूंनी उत्तर दिले, "माझे
राज्य या जगाचे नाहीये, जर ते या जगाचे राहिले असते तर, माझे सेवक लढले
असते यासाठी की मला यहूदयांच्या हाती सोपवता येऊ नये, पण आता माझे
राज्य येथील नाही." 37 पिलात त्यांना म्हणाला, 'तर मग तू राजा आहेस
काय?' येशू म्हणाले, "आपण बरोबर म्हणत आहा कारण, मी राजा आहे. मी
यास्तव जन्म घेतला व यासाठी या जगात आलो की सत्याविषयी साक्ष दयावी.
जो कोणी सत्याचा आहे तो माझा शब्द ऐकतो." 38 पिलात त्यांना म्हणाला,
'सत्य काय आहे? असे बोलल्यानंतर तो पुन्हा यहूदयांकडे आला आणि त्यांना
म्हणाला, 'मला त्याच्यामध्ये काही दोष आढळत नाही. 39 पण तुमचा रिवाज
आहे की, मी वल्हांडणाच्या सणात तुमच्यासाठी एक माणूस सोडावा, तुमची
इच्छा आहे काय की, मी तुमच्यासाठी यहूदयांच्या राजास सोडून दयावे?'
40 तेव्हा ते पुन्हा ओरडून म्हणाले, 'येशूला नाही परंतु आमच्यासाठी बरब्बाला
सोडून दया'. बरब्बा हा एक डाकू होता.

19 1 यावर पिलाताने येशूंना चाबकाच्या फटक्यांनी फोडले. 2 आणि
शिपायांनी काटयांचा मुकुट गुंफून तो त्यांच्या डोक्यावर ठेवला;
त्यानी त्यांना जांभळे वस्त्र घातले. 3 ते त्यांच्याजवळ येऊन थटटा् करू लागले,
'यहूदयांच्या राजा प्रमाण!' व त्यानी येशूंना चपराकाही मारल्या. 4 मग पिलात
पुन्हा बाहेर आला आणि लोकांना म्हणाला, 'पाहा, मी त्याला तुमच्यासमोर
पुन्हा बाहेर घेऊन येतो, यासाठी की, तुम्हाला कळावे की, मला याच्यात काही
एक दोष आढळला नाही.' 5 मग येशू काटयांचा मुकुट आणि जांभळे वस्त्र
घालून बाहेर आले. पिलात त्यांना म्हणाला, 'पाहा, हा मनुष्य!' 6 ज्यावेळी
प्रमुख याजक व सेवकांनी त्यांना पाहिले त्यावेळी ओरडून म्हणाले, 'त्याला
क्रूसावर खिळा क्रूसावर!' पिलात त्यांना म्हणाला, 'तुम्हीच त्याला घेऊन जा
आणि क्रूसावर टांगा कारण मला त्याच्यात कोणताच दोष आढळत नाही.'

7 यहूदयांनी पिलाताला उत्तर दिले, 'आमचाही कायदा आहे, त्या कायद्यान्वये
हा जिवे मारले जाण्याच्या लायकीचा आहे कारण, त्याने स्वतःला परमेश्वराचा
पुत्र म्हटलेले आहे.' 8 जेव्हा पिलाताने ही गोष्ट ऐकली तेव्हा त्याला जास्तच
भीति वाटली. 9 तो पुन्हा किल्ल्यात गेला व येशूंना म्हणाला, 'तू कोठला
आहेस?' पण येशू शांत राहिले. 10 पिलाताने त्यांना म्हटले, "माझ्याबरोबर
का बोलत नाहीस? तुला ठाऊक नाही काय की, तुला सोडण्याचा व क्रूसावर
खिळण्याचाही मला अधिकार आहे? 11 येशूंनी उत्तर दिले, "जर तुम्हाला वरून
देण्यात आला नसता तर, तुमचा माझ्यावर काहीच अधिकार नसता, म्हणून
ज्याने मला तुमच्या हाती धरून दिले आहे, त्याचा अपराध अधिक आहे." 12 हे
ऐकून पिलाताने त्याला सोडून देण्याची इच्छा बाळगली परंतु यहूदी ओरडून
ओरडून म्हणाले, 'जर आपण याला सोडून दिले तर, कैसरासाठी आपली निष्ठा
नाही; जो कोणी स्वतःला राजा करतो (म्हणवतो) तो कैसराचा विरोध करतो.'
13 या गोष्टी ऐकून पिलात येशूंना बाहेर घेऊन आला. त्या ठिकाणी एक सपाट
जागा होती, इब्री भाषेत या जागेला गब्बाथा म्हणतात आणि तो न्यायासनावर
बसला. 14 वल्हांडणाच्या तयारीचा तो दिवस होता व दुपारची वेळ होती.
मग त्याने, यहूदयांना म्हटले, "पाहा, हाच आहे तुमचा राजा!' 15 पण ते
किंचाळून म्हणाले, 'घेऊन जा! घेऊन जा! त्याला क्रूसावर खिळा!' पिलात
त्यांना म्हणाला, "काय मी तुमच्या राजाला क्रूसावर खिळू?' प्रमुख याजकांनी
उत्तर दिले, 'कैसराशिवाय आणखी कोणीही आमचा राजा नाही.' 16 मग त्याने
येशूंना त्यांच्या सुपुर्द (सोपवले) केले यासाठी की, येशू क्रूसावर खिळले जावेत.
17 त्यानंतर येशू आपला क्रूस खांब वाहून, त्या स्थानापर्यंत बाहेर गेले ज्यास
कवटीचे स्थान म्हणतात; इब्री भाषेत त्याला गुलगुथा म्हणतात. 18 तेथे त्यानी
येशूंना व त्यांच्याबरोबर आणखी दोन चोरांना क्रूसावर खिळले, एकाला
उजवीकडे व दुसऱ्याला डावीकडे आणि येशूंना मधोमध टांगले. 19 पिलाताने
एक आरोपपत्र लिहून ते क्रूसावर लावले, त्याच्यावर असे लिहिलेले होतेः 'येशू
नासोरी यहूदयांचा राजा'. 20 हे दोष-पत्र पुष्कळ यहूदयांनी वाचले कारण ते
स्थान जेथे येशूंना टांगले होते, ते नगराजवळ होते. हे दोषपत्र इब्री, लॅटिन
(रोमन) व ग्रीक भाषेत लिहिलेले होते. 21 मग यहूदयांच्या प्रमुख याजकाने
पिलाताला म्हटले, 'यहूदयांचा राजा' असे लिहू नका, परंतु असे की, त्याने

म्हटले, 'मी यहूदयांचा राजा आहे." 22 पिलात म्हणाला, 'मी जे लिहिले ते
लिहिले.' 23 येशूंना क्रूसावर टांगण्याचे कार्य संपले तेव्हा त्यानी येशूंचे कपडे
घेऊन चार भाग केले, प्रत्येक शिपायासाठी एक भाग, न शिवलेला जो अंगरखा
होता आणि वरून खालपर्यंत संबंध विणलेला होता तो सुद्धा घेतला 24 ते
आपसात म्हणाले की आपण ते न फाडता त्यावर चिठ्या टाकू की तो कोणी
घ्यावा. असे अशासाठी झाले की पवित्रशास्त्राचे (बायबल) ते वचन पूर्ण व्हावे
की, त्यानी माझे कपडे आपसांत वाटून घेतले आणि माझ्या कपडयांवर चिठया
टाकल्या. 25 म्हणून शिपायांनी तसेच केले. येशूंच्या क्रूसाजवळ त्यांची आई व
त्यांच्या आईची बहीण आणि क्लोपाची पत्नी मरीया व मरीया मग्दालीया
उभ्या होत्या. 26 येशू आपल्या आईस व त्या शिष्याला ज्यावर त्याचे प्रेम होते,
जवळ उभे असलेले पाहून आईला म्हणाले, 'बाई पाहा, हा तुझा मुलगा आहे;'
27 त्यानंतर त्या शिष्याला म्हणाले, "ही तुझी आई आहे!" त्याच समयापासून
तो शिष्य मरीयेला आपल्या घरी घेऊन गेला. 28 त्यानंतर असे जाणून की आता
सर्व पूर्ण झालेलेच आहे येशू म्हणाले, "मला तहान लागली आहे", यासाठी
की पवित्रशास्त्राचे (बायबल) वचन पूर्ण व्हावे. 29 त्याठिकाणी आंब भरलेले
एक पात्र होते, म्हणून त्यानी आंबेने भरलेला स्पंज एजोबाच्या काठीवर ठेवून
येशूंच्या तोंडाला लावला. 30 येशूंनी तो आंब चाखला आणि म्हटले "पूर्ण झाले"
व डोके खाली नमवून आपला प्राण त्यागला. 31 तो तयारीचा दिवस होता
म्हणून यहूदी लोकांनी पिलाताला विनंती केली की येशूंचे पाय मोडावेत आणि
त्यांना खाली आणावे, कारण शब्बाथाच्या दिवशी त्यानी क्रूसावर राहू नये.
तो शब्बाथाचा खास दिवस होता. 32 शिपायांनी येऊन आधी पहिल्याचे पाय
मोडले, त्यानंतर दुसऱ्याचेही, (जे येशूंबरोबर खिळले होते), 33 परंतु जेव्हा
त्यानी येशूंजवळ येऊन पाहिले तेव्हा त्यांना आढळले की येशू मेलेले आहेत,
तेव्हा त्यानी त्याचे पाय मोडले नाही. 34 पण शिपायांपैकी एकाने त्यांच्या
कुशीत भाला भोसकला व त्यातून लगेच रक्त व पाणी निघाले. 35 ज्याने हे सर्व
पाहिले त्यानेच ही साक्ष दिली आहे आणि त्याची साक्ष खरी आहे व त्याला
शाश्वती (खात्री) आहे की, तो खरे बोलतो आहे, जेणेकरून तुम्हीही विश्वास
ठेवावा. 36 या गोष्टी अशासाठी झाल्या की बायबलचे ते वचन पूर्ण व्हावे की,
'त्याचे एकही हाड मोडले जाणार नाही.' 37 एका दुसऱ्या वचनातही असे

लिहिले आहे की, ज्या येशूंना त्यानी भोसकले, ते त्याला पाहातील. 38 सर्वकाही
घडल्यानंतर अरिमथाईच्या योसेफाने जो, येशूंचा शिष्य होता (पण यहूदयांच्या
भीतिने ही गोष्ट गुप्त ठेवून होता) पिलाताला विनंती केली की, त्याला येशूंचे
मृत शरीर नेता यावे. तेव्हा पिलाताने त्याची विनंती ऐकली व तो येऊन येशूंचे
शरीर घेऊन गेला. 39 निकदेम देखील, जो आधी, एके रात्री येशूंकडे आला
होता, सुमारे पन्नास शेर गंधरस व अगरू यांचे मिश्रण घेऊन आला. 40 मग
येशूंचे शरीर घेऊन त्यानी, यहूदयांच्या पुरण्याच्या रीतीनुसार त्याचे शरीर
सुगंधित मसाल्यांसह (द्रव्य) वस्त्रात गुंडाळले. 41 त्या स्थानावर, जेथे येशूंना
खिळले होते, एक बगीचा होता, त्यात एक नवी कबर होती, जिच्यात कधीही
कोणालाही ठेवलेले नव्हते. 42 यहूदयांच्या तयारीचा दिवस असल्यामुळे त्यानी
येशूंना तिच्यातच ठेवले कारण, ती कबर जवळ होती.

20 1 आठवडयाच्या पहिल्या दिवशी मरीया मग्दालीया अगदी पहाटे
जेव्हा अंधारच होता, कबरेवर आली. कबरेवरची धोंड बाजूला
केलेली तिने पाहिली. 2 तेव्हा ती धावतच गेली आणि शिमोन पेत्र व ज्याच्यावर
येशू प्रेम करत होते त्या दुसऱ्या शिष्याजवळ येऊन म्हणाली, 'ते प्रभूंना कबरेतून
घेऊन गेले आहेत, आम्हाला ठाऊक नाहीये की, त्यांना कोठे ठेवले आहे.' 3 तेव्हा
पेत्र आणि तो दुसरा शिष्य बाहेर पडून कबरेकडे निघाले. 4 दोघे सोबतच
धावत होते परंतु दुसरा शिष्य पेत्राहून पुढे निघून कबरेवर प्रथम पोहंचला.
5 त्याने वाकून कपडे पडलेले पाहिले, तरीपण तो आत मात्र गेला नाही. 6 मग
शिमोन पेत्र त्याच्या मागे-मागे पोहंचला आणि कबरेत शिरला, त्यानेही कपडे
पडलेले पाहिले. 7 येशूंच्या डोक्याला बांधलेला रूमाल त्याने कपडयांजवळ
नव्हे तर, वेगळा एका बाजूला गुंडाळून पडलेला पाहिला. 8 दुसरा शिष्य जो
कबरेवर आधी पोहंचला होता तोही आत गेला आणि ते पाहून त्याने विश्वास
ठेवला. 9 पवित्रशास्त्रातील ते वचन की, येशूंना मेलेल्यांतून जिवंत उठणे गरजेचे
आहे, तोवर त्यांना समजलेले नव्हते. 10 यानंतर ते शिष्य आपल्या घरी परत
गेले. 11 पण मरीया रडत कबरेजवळ उभी राहिली होती. 12 रडता रडता
तिने कबरेत वाकून पाहिले; तेव्हा तिने उज्जवल कपडे घातलेले असे दोन
परमेश्वरदूत एक उशाजवळ व एक पायथ्याजवळ बसलेले पाहिले; 13 ते तिला

म्हणाले, 'बाई, तू का रडते आहे?' ती त्यांना म्हणाली, 'ते माझ्या स्वामीस
घेऊन गेले आणि मला ठाऊक नाहीये की त्यांना कोठे ठेवले आहे. 14 असे बोलून
ती वळली व तिने येशूंना उभे असलेले पाहिले, परंतु ओळखले नाही की, ते येशू
आहेत. 15 येशू तिला म्हणाले, "बाई, तू का रडतेस? कोणाला शोधतेस"? माळी
समजून ती त्यांना म्हणाली, 'माळी दादा, आपण जर त्यांना नेले आहे तर मला
सांगा की त्यांना कोठे ठेवले आहे म्हणजे मी त्यांना घेऊन जाईन. 16 येशू तिला
म्हणाले, "मरीये!" मागे वळून तिने पाहिले आणि म्हणाली, 'गुरूजी!' 17 येशू
तिला म्हणाले, "मला स्पर्श करू नको कारण अजूनही मी पित्याजवळ वर गेलो
नाहीये; माझ्या भावांकडे जा, त्यांना सांग की, मी माझा पिता आणि तुमचा
पिता, माझा परमेश्वर व तुमचा परमेश्वर, यांच्याकडे वर जातो आहे. 18 मरीया
मग्दालियाने जाऊन शिष्यांना सांगितले की, मी प्रभूंना पाहिले आहे आणि
त्यानी मला या गोष्टी सांगितल्या. 19 तो आठवडयाचा पहिला दिवस होता व
संध्याकाळचा समय होता. यहूदयांच्या भीतिमुळे शिष्यांनी खोलीची दारें बंद
करून ठेवली होती; तेव्हा येशू आले व मध्यभागी उभे राहून त्यांना म्हणाले,
"तुम्हास शांति मिळावी". 20 असे बोलून येशूंनी तुझे हात व कूस (छाती) त्यांना
दाखवली. मग शिष्य येशूंना पाहून आनंदीत झाले. 21 येशू त्यांना पुन्हा म्हणाले,
"तुम्हास शांति मिळावी. जसे पित्याने मला पाठवले आहे तसेच मी देखील
तुम्हाला पाठवतो आहे, असे बोलून येशूंनी त्यांच्यावर फुंकर टाकला व त्यांना
म्हटले, पवित्र आत्मा घ्या. 23 ज्यांचे पाप तुम्ही क्षमा कराल, त्यांच्यासाठी ते
क्षमा करण्यात आलेले आहेत आणि ज्यांचे पाप तुम्ही ठेवता ते तसेच ठेवण्यात
आलेले आहेत." 24 येशू जेव्हा तेथे आले तेव्हा बारा शिष्यंापैकी एक शिष्य
थोमा ज्याला दिदुम म्हणतात, त्यांच्याबरोबर नव्हता. 25 जेव्हा इतर शिष्य
त्याला सांगू लागले की आम्ही प्रभूंना पाहिले आहे, तेव्हा तो त्यांना म्हणाला,
'जोवर मी त्यांच्या हातांत खिळयांचे घाव पाहात नाही व खिळयांच्या घावांत
तुझे बोट घालत नाही, तोवर मी विश्वास धरणार नाहीच मुळी. 26 आठ
दिवसानंतर जेव्हा त्याचे शिष्य घरात होते तेव्हा थोमाही त्यांच्याबरोबर
होता. दारें बंद होती. तेव्हा येशू पुन्हा आले आणि मध्ये उभे राहून म्हणाले,
"तुम्हास शांति मिळावी". 27 त्यानी थोमाला म्हटले, "तुझे बोट येथे आण,
माझे हात पाहा, आपला हात पुढे करून माझ्या कुशीत घाल आणि अविश्वासू

नव्हे विश्वासू हो". 28 हे ऐकताच थोमा म्हणाला, 'हे माझ्या प्रभो, हे माझ्या
परमेश्वरा!' 29 येशू त्याला म्हणाले, "तू मला पाहिल्यावर विश्वास ठेवला आहे;
ज्यांनी न पाहता विश्वास ठेवला ते आशीर्वादीत आहेत." 30 येशूंनी इतर अनेक
चिन्हें शिष्यांदेखत केली, जी या पुस्तकात लिहिलेली नाहीत. 31 पण या गोष्टी
अशासाठी नमूद (लिहून) करून ठेवलेल्या आहेत की तुम्ही विश्वास ठेवावा की,
येशूच परमेश्वराचे पुत्र आहेत, मशीहा आहेत व विश्वास ठेवून त्यांच्या नांवाने
जीवन मिळवून घ्यावे.

21 1 या गोष्टी झाल्यानंतर तिबिर्याच्या सरोवराकाठी येशूंनी स्वतःला
शिष्यांवर प्रगट केले. ही घटना अशाप्रकारे घडलीः 2 शिमोन पेत्र व
थोमा ज्याला दिदुम म्हणतात तसेच गालीलाच्या काना नगरातील नथनेल,
जब्दीची मुले व त्यांच्या शिष्यंापैकी आणखी दुसरे दोन तेथे एकत्र जमलेले
होते. 3 शिमोन पेत्र त्यांना म्हणाला, 'मी मासे धरावयस जातोय.' ते त्याला
म्हणाले, 'आम्हीही तुझ्याबरोबर येतोय', म्हणून ते निघाले आणि नावेत बसले
पण त्या रात्री त्यानी काहीच धरले नाही. 4 पहाट होताच येशू सरोवराकाठी
उभे होते, तरीही शिष्य ओळखू शकले नाही की ते येशूच आहेत. 5 तेव्हा
येशू त्यांना म्हणाले, "मुलांनो, तुमच्याजवळ खावयास काही आहे काय?" ते
म्हणाले, 'नाही'. 6 येशू त्यांना म्हणाले, "नावेच्या उजव्या बाजूस जाळे टाका
तर तुम्हाला मासे धरता येतील." तेव्हा त्यानी जाळे टाकले, पण माशांच्या
विपुलतेमुळे त्यांना जाळे ओढता आले नाही, 7 म्हणून ज्या शिष्यावर येशूंचे प्रेम
होते तो पेत्राला म्हणाला, 'हे तर प्रभुजीच आहेत'. शिमोन पेत्राने ऐकले की,
ते प्रभुजी आहेत तेव्हा ताबडतोब त्याने कमरेला अंगरखा गुंडाळला, कसला,
कारण तो उघडा होता. त्याने सरोवरात उडी टाकली; 8 बाकीचे शिष्य मात्र
नावेतून माशांनी भरलेले जाळे ओढत आले कारण ते लोक किनाऱ्यापासून
अधिक लांब नव्हे पण फक्त दोनशे हातांवर होते. 9 जेव्हा ते काठावर उतरले
तेव्हा त्यानी कोळशाचा विस्तव व त्याच्यावर असलेला मासा आणि भाकर
पाहिली. 10 येशू म्हणाले, "जे मासें तुम्ही आता धरले त्यांतून काही घेऊन या".
11 शिमोन नावेत चढला आणि त्याने एकशे त्रेपन्न मोठे मासे असलेले (भरलेले)
जाळे किनाऱ्याकडे ओढले व इतके मासे असल्यावरही त्याचे जाळे फाटले नाही.

12 येशू म्हणाले, "या, आपण भोजन करू यात." परंतु शिष्यंापैकी एकाचीही
हिंमत झाली नाही की, ते कोण आहेत असे विचारावे. कारण त्यांना ठाऊक
झालेच होते की, ते प्रभुजीच आहेत. 13 येशू आले, त्यानी शिष्यांना भाकर व
मासा दिला. 14 ही तिसरी वेळ होती, जेव्हा येशू मेलेल्यांतून उठल्यानंतर त्यानी
शिष्यांना दर्शन दिले होते. 15 भोजन झाल्यानंतर, येशू शिमोन पेत्राला म्हणाले,
"शिमोना, योहानाच्या मुला, तू माझ्यावर इतरांपेक्षाही (यांच्या) अधिक प्रेम
करतो काय?" तो म्हणाला, 'होय, प्रभुजी, आपण जाणता की, मी आपल्यावर
प्रेम करतो.' येशू त्याला म्हणाले, "माझी कोकरें चार". 16 येशूंनी दुसऱ्यांदा
त्याला म्हटले, "शिमोना, योहानाच्या मुला! तू माझ्यावर प्रेम करतो काय?" तो
त्यांना म्हणाला, 'होय प्रभुजी, आपल्याला ठाऊक आहे की, मी आपणावर प्रेम
करतो.' ते त्याला म्हणाले, '?'माझ्या मेंढरांचे रक्षण कर"; 17 येशूंनी तिसऱ्यांदा
त्याला म्हटले, "शिमोना! योहानाच्या मुला, तुझे माझ्यावर प्रेम आहे काय?"
'मला तिसऱ्यांदा येशूंनी विचारले की, मी त्यांच्यावर प्रेम करतो काय' हे ऐकून
पेत्र उदास झाला. तो त्यांना म्हणाला, 'हे प्रभो, आपण सर्वकाही जाणता,
आपणास हे सुद्धा ठाऊक आहे की, मी आपल्यावर प्रेम करतो; येशू त्याला
म्हणाले, "माझी मेंढरें चार!" 18 मी तुम्हाला सत्य सत्य सांगतो की, तुम्ही तरूण
होता तेव्हा, आपली कंबर बांधून हवे तेथे (इच्छा) जात होता, पण जेव्हा तुम्ही
म्हातारे व्हाल तेव्हा, तुझे हात पसराल व दुसरा तुमची कंबर बांधून, तुमची
इच्छा नसेल तेथे तुम्हाला घेऊन जाईल. 19 या कथनाने येशूंनी संकेत दिला की,
कशाप्रकारच्या मृत्यूने पेत्र, परमेश्वराची महिमा करील; असे बोलल्यानंतर येशू
त्याला म्हणाले, "माझे अनुसरण (मागे ये) कर" 20 पेत्र मागे वळला व त्याने,
ज्याच्यावर येशू प्रेम करत होते व ज्याने भोजनाच्या समयी, येशूंच्या उराशी
टेकून विचारले होते की, 'हे प्रभो! आपणाला कोण धरून देणार, त्या शिष्याला
मागे येतांना पाहून 21 येशूंना विचारले, "हे प्रभो! याचे काय होणार आहे?"
22 येशू पेत्राला म्हणाले, "मी येईपर्यंत त्याने राहावे (जगावे) अशी माझी इच्छा
असेल तर तुला त्याविषयी काय करावयाचे आहे? तू माझ्या मागे ये". 23 या
कारणामुळे भावांत अशी गोष्ट पसरली की तो शिष्य मरणार नाही. येशू असे
म्हणाले नव्हते की तो मरणार नाही, त्यानी असे म्हटले होते की, जर माझी
इच्छा असेल की, मी येईपर्यंत त्याने राहावे, तर तुझे त्याच्याशी काय घेणे देणे

आहे. [24] होय, हा तोच शिष्य आहे, जो या गोष्टींची साक्ष देतो आहे; त्यानेच या
सर्व गोष्टी लिहिल्या आहेत आणि आम्हास ठाऊक आहे की, त्याची साक्ष खरी
आहे. [25] आणखी पुष्कळ कृत्यें येशूंनी केला, जर ती एक एक अशी लिहिण्यात
आली असती तर, माझ्या मते, जी पुस्तकें लिहिली गेली असती ती, जगात
मावली (समावली) नसती.